मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | मुंबई, रविवार, २५ ऑगस्ट २०२४ | वर्ष- २९ | अंक - ६६ | पाने- ८

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



संतप्त जनता!
डरपोक राज्यकर्ते!!

पान ८

## म ह त्त्वा चे

### पंतप्रधान मोदी आज जळगावमध्ये

**जळगाव :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्रातील जळगाव आणि राजस्थानमधील जोधपूरला भेट देणार आहेत. सकाळी सुमारे सव्वाअकरा वाजता ते लखपती दीदी संमेलनात सहभागी होणार आहेत. तर साडेचार वाजण्याच्या सुमाराला जोधपूर येथील राजस्थान उच्च न्यायालयाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, पंतप्रधान जळगावला भेट देणार असून लखपती दीदी संमेलनात सहभागी होणार आहेत. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात नुकत्याच लखपती बनलेल्या नवीन 11 लाख लखपती दीदींना ते सन्मानित करणार असून त्यांना प्रमाणपत्र देणार आहेत. याशिवाय ते देशभरातील लखपती दीदींशी संवाद देखील साधणार आहेत.

### पुण्याजवळ हेलिकॉप्टर कोसळले



**पुणे :** पुणे जिल्ह्यातील पौड जवळ असलेल्या घोटावडे या ठिकाणी आज हेलिकॉप्टर कोसळले. खराब हवामान आणि पाऊस यामुळे हेलिकॉप्टर कोसळले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात होता. या हेलिकॉप्टरमध्ये पायलट सोबतच तीन प्रवासी प्रवास करत होते. हे सर्व जखमी झाले असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत कोणाचाही मृत्यू झाला नसल्याचा माहिती देखील समोर आली आहे. मुंबईमधील ग्लोबल या कंपनीचे हे हेलिकॉप्टर आहे. यामध्ये पायलटसह तीन प्रवासी देखील प्रवास करत होते. मात्र, अचाकन ते पुण्यातील पौड जवळ असलेल्या घोटावडे या भागात कोसळले. या घटनेचा एक व्हिडीओ देखील प्रचंड व्हायरल झाला आहे. या परिसरातील नागरिकांनी तात्काळ धाव घेत जखमींची मदत केल्याची प्राथमिक माहिती देखील समोर आली आहे. हे हेलिकॉप्टर मुंबईवरुन आंध्रप्रदेशातील विजयवाडा येथे जात असल्याचे समजते.

### मुंबई संततधार...

**मुंबई :** काही दिवस विश्रांती घेणाऱ्या पावसाने आज, शनिवारी सकाळपासून संततधार, तर अधूनमधून मुसळधार बरसात केल्याने हवेत काहीसा गारवा निर्माण झाला आहे. आज सकाळी 8 पासून ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत शहर भागात 23.09 मिमी, पूर्व उपनगरात 46.91 मिमी, तर पश्चिम उपनगरात 50.59 मिमी इतक्या पावसाची नोंद करण्यात आली आहे. रात्री 8 नंतरही पावसाचा जोर कायम होता. शहर भागातील दादर परिसरात 39 मिमी, धारावी 35 मिमी, माटुंगा 39 मिमी, पूर्व उपनगर भागातील कुर्ला एलबीएस मार्ग 93 मिमी, पवई 68 मिमी, घाटकोपर 70 मिमी, पश्चिम उपनगर भागातील मागाठाणे येथे सर्वाधिक 107 मिमी, एक्सर 94 मिमी, चारकोप 85 मिमी, बोरिवली 84 मिमी, तर दिंडोशी 68 मिमी इतक्या पावसाची नोंद करण्यात आली आहे.

# मविआचे राज्यभरात मूक आंदोलन

**प्रतिनिधी**
**मुंबई**

महाविकास आघाडीने बदलापूरच्या घटनेविरोधात महाराष्ट्र बंदची आज शनिवारी हाक दिली होती. परंतु, मुंबई उच्च न्यायालयाने हा बंद बेकायदेशीर असल्याचे म्हटल्यानंतर मविआकडून राज्यातील विविध भागात निषेध आंदोलन करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, ठाकरे सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह महाविकास आघाडीतील अन्य प्रमुख नेत्यांनी राज्यातील विविध भागात, तोंडाला काळी पट्टी आणि हाताला काळी रीबीन बांधून मूक आंदोलन केले.

शरद पवार यांनी पुण्यात आंबेडकर पुतळ्याखाली आंदोलन केले, यावेळी त्यांच्यासोबत शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. खासदार सुप्रिया सुळे यांनी पावसात भिजत उपस्थितांना संबोधित केले. उद्धव ठाकरे यांनी शिवसेना भवन येथे आंदोलन केले. शिवसेनेभवनाबाहेर खासदार संजय राऊत आणि आमदार आदित्य ठाकरे, यांच्यासोबत शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.

अंबादास दानवे यांनी छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकात आंदोलन केले. ठाण्यातील महात्मा गांधी उद्यान येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आंदोलन केले. काँग्रेस ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण आणि खासदार वर्षा गायकवाड यांनी मुंबईतील नागपाडा जंक्शन येथे आंदोलन केले. नागपूर शहरातील संविधान चौकात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मूक आंदोलन केले.



# अपमानात जातीचा उल्लेख असला तरच ॲट्रॉसिटी होणार दाखल

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

अनुसूचित जाती-जमातीच्या व्यक्तीचा त्याच्या जातीचा उल्लेख न करता अपमान केला जात असेल, तर हे प्रकरण ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा ठरणार नाही. असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने ऑनलाइन मल्याळम वृत्तवाहिनीचे संपादक शाजन स्कारिया यांना अटकपूर्व जामीन मंजूर करताना हा निर्णय दिला. 1989 कायद्याच्या कलम 3(1)(आर) आणि 3(1)(यू) अन्वये स्कारियांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. सीपीएमचे आमदार पी. व्ही. श्रीनिजन, जे एससी समुदायाचे आहेत, त्यांना



माफिया डॉन म्हटल्याचा आरोप त्यांच्यावर होता. या प्रकरणी ट्रायल कोर्ट आणि केरळ उच्च न्यायालयाने त्यांना अटकपूर्व जामीन देण्यास नकार दिला होता.

आरोपी स्कारियांच्यावतीने वकील सिद्धार्थ लुथरा आणि गौरव अग्रवाल यांनी युक्तिवाद केला. एससी आणि एसटी समुदायाच्या सदस्याचा जाणीवपूर्वक केलेला प्रत्येक अपमान आणि धमकी हा जाती आधारितअपमान मानला जाणार नाही, पान 3 वर

# 'एमएमआर' हे विकसित भारताचे पॉवर हाऊस ठरेल: मुख्यमंत्री शिंदे

## नागरी विकास, पायाभूत सुविधांमुळे गुंतवणूक येणार

**प्रतिनिधी**
**मुंबई**

भारताच्या 'फाईव्ह ट्रिलीयन डॉलर्स' अर्थव्यवस्थेचे स्वप्न साकारण्यात मुंबई महानगर प्रदेशाचा सिंहाचा वाटा राहणार आहे. या प्रदेशातील महत्वाकांक्षी पायाभूत सुविधांना गती देण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्देश दिले आहेत.

एमएमआर प्रदेश 2047 मधील विकसित भारतातील अर्थव्यवस्थेसाठी 'पॉवर हाऊस' ठरणार असून, यातील दळणवळण, शाश्वत नागरी विकास आणि पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांना गती देणारी मोठी गुंतवणूक महाराष्ट्रात येईल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला आहे. एमएमआर प्रदेशाचा नागरी विकासाच्या दृष्टीने कायापालट होऊ शकणाऱ्या या प्रकल्पांमध्ये 'प्लॅटिनम' आणि 'सुवर्ण' प्रकल्प अशा श्रेणीमध्ये आखणी केली जात आहे.



अटल सेतू (मुंबई ट्रान्स हार्बर लींक), अलिबाग, गोराई आणि मढ या तीन पर्यटन विकास क्षेत्रांचा, आणि खारबांव इंटिग्रेटेड लॉजिस्टिक्स पार्क, अणगांव-सापे, वाढवण आणि दिघी येथील औद्योगिक नगरींचा समावेश आहे.

अटल सेतू हा प्रकल्प पूर्ण झाला आहे. अलिबाग, गोराई आणि मढ या क्षेत्रात जागतिकस्तरावरील आधुनिक अशा पर्यटन सुविधा निर्माण करण्यासाठी गुंतवणूक करण्यात येईल. वसई मधील खारबांव इथे 248 हेक्टरवर ग्रीनफिल्ड इंडस्ट्रियल पार्क साकारण्यात येणार आहे. ज्यामुळे 560 कोटी डॉलर्सची गुंतवणूक येणे शक्य होणार आहे.

अणगांव – सापे, वाढवण आणि दिघी इथे औद्योगीक नगरी विकसित केल्या जातील. हाय-ग्रोथ इंडस्ट्रीयल हब म्हणून यांचा विकास केला जाईल. ज्यातून उत्पादन क्षेत्र म्हणून आणि मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीचा परिसर म्हणून तीन ठिकाणी मिळून सुमारे हजार कोटी डॉलर्सची गूंतवणूक होईल,अशी अपेक्षा आहे.

सुवर्ण प्रकल्पांतर्गत नैना प्राधिकरणांतर्गत बारा ठिकाणी टाऊनशिप प्रकल्प, मुंबई-पुणे हायवे सर्व्हिस लेन, गोरेगांव-ठाणे टनेल आणि सिंहगड रस्ता यासह, सार्वजनिक वाहतूक सुविधांचे प्रकल्प, सागरी-हवाई आणि रेल्वेचे पायाभूत सुविधा प्रकल्प, रस्ते वाहतुकीचे महत्वांकाक्षी प्रकल्प, मुंबई-अहमदाबाद (हायस्पीड रेल्वे) बुलेट ट्रेन, एकात्मिक नदी पुनरुज्जीवन प्रकल्प अशा प्रकल्पांचा समावेश आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव क्षेत्रातील नैना प्राधिकरणांतर्गत एमएमआरडीए बारा ठिकाणी परवडणारी घरे श्रेणीतील गृहनिर्माण प्रकल्प उभे पान 3 वर

# नव्या पेन्शन योजनेला केंद्राची मंजुरी

## 23 लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांना फायदा, 1 एप्रिल 2025 पासून लागू होणार

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

नवीन पेन्शन योजना (NPS) ऐवजी केंद्र सरकारने आता केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी युनिफाइड पेन्शन स्कीम (UPS) जाहीर केली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी शनिवारी, 24 ऑगस्ट रोजी सांगितले की, यूपीएस 1 एप्रिल 2025 पासून लागू होईल. 23 लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांना UPS चा फायदा होणार आहे. कर्मचाऱ्यांना UPS किंवा NPS पेन्शन योजना निवडण्याचा पर्याय असेल. राज्य सरकारची इच्छा असेल तर तेही या योजनेशी जुळू शकतात. राज्य कर्मचारी सामील झाल्यास सुमारे 90 लाख कर्मचाऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे.

नवीन पेन्शन योजनेत, कर्मचाऱ्याला त्याच्या मूळ वेतनाच्या 10% योगदान द्यावे लागते आणि सरकार 14% देते. आता कर्मचाऱ्याला यूपीएसमध्ये कोणतेही योगदान द्यावे लागणार नाही. सरकार, त्याच्या भागावर, कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनाच्या 18.5% योगदान देईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निवासस्थानी केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या नेत्यांची बैठक घेतली. यासंदर्भात कार्मिक मंत्रालयाने 21 ऑगस्ट रोजी नोटीस जारी केली होती. जम्मू-काश्मीर आणि हरियाणा या दोन राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होत असताना ही बैठक झाली. गेल्या 10 वर्षांतील ही पहिलीच बैठक आहे, ज्यामध्ये पंतप्रधान आणि केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या राष्ट्रीय परिषदेचे सदस्य म्हणजेच जॉइंट कन्सल्टेटिव्ह मशिनरी (JCM) उपस्थित होते. जुन्या पेन्शन योजना (OPS), नवीन पेन्शन योजना (NPS) आणि 8 व्या वेतन आयोगाबाबत बैठकीत चर्चा झाली.

# 'मविआ'मध्ये ठाकरे शिवसेना मोठा भाऊ

## मुंबईत सेनेला मिळणार जास्त जागा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

महाविकास आघाडीत ठाकरे सेनाच मोठा भाऊच्या भूमिकेत राहणार आहे. विधानसभा निवडणुकीत ठाकरे सेनेच्या शिवसेनेला जास्त जागा मिळण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाला मुंबईतून सर्वाधिक जागा मिळणार आहे. मुंबईत शिवसेनेला जास्त जागा देण्यासंदर्भात बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याचं सांगण्यात येत आहे.

दिवाळीनंतर विधानसभा निवडणूक होणार असून महाविकास आघाडी त्यापार्श्वभूमीवर तयारीला लागलीय. लोकसभेत यशस्वी अजेंडा राबवल्यानंतर मविआ विधानसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना कोणत्या मुद्द्यावरुन घेरायचं याची रणनीती ठरवत आहे.

विधानसभेच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या मुंबईत बैठक सुरू आहेत. ठाकरे गटाने मुंबईतील विधानसभेच्या 36 पैकी 20 जागांची मागणी केलीय. ठाकरे सेनेचा मुंबईतील असलेला बेस आणि लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाला मिळालेलं प्रचंड यश यामुळे ठाकरे गटाने आघाडीकडे 20 जागा मागितल्याची माहिती सूत्रांनी दिलीय. मुंबईतील एका जागेवर तिन्ही पक्षांनी दावा सांगितल्याने महाविकास आघाडीत एका जागेवरून पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

दरम्यान या बैठकीसंदर्भात शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी संवाद साधला. मुंबईत शिवसेना हा मोठा भाऊ असेल, यावर आक्षेप घेण्याचं कारण नाही जे सत्य आहे ते सत्य आहे. आजच्या बैठकीत फक्त राजकीय चर्चा झाली. वांद्रे येथील हॉटेल ट्रायडंट येथे महाविकास आघाडीची बैठक झाली.

# कोकणातले रस्ते खराब, मला ट्रेननं यावं लागलं...

## आठवलेंचा भाजपला घरचा आहेर

**प्रतिनिधी**
**खेड**

मुंबई-गोवा महामार्गाच्या दूरवस्थेवरुन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केंद्र सरकारला घरचा आहेर दिला आहे. केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी देशातील अनेक रस्ते केले, पण कोकणातील रस्ते अजूनही खराब आहेत, असे सांगत आठवले यांनी या महामार्गाच्या दूरवस्थेवरून सरकारवर निशाणा साधला आहे.


केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी देशातील अनेक रस्ते केले. मात्र, कोकणातील रस्ते अजूनही खराब आहेत. मी रस्त्याने येणार होतो पण रस्ता खराब असल्यामुळे मला ट्रेनने यावं लागल्याचे आठवले यांनी सांगितलं. खेडमधील नागरी सत्कार कार्यक्रम दरम्यान रामदास आठवले बोलत होते. मुंबई-गोवा, मुंबई अहमदाबाद आणि मुंबई-पुणे महामार्गाच्या दूरवस्थेबाबत विरोधक आणि जनता रोष व्यक्त करत आहे. मात्र, आता रामदास आठवले यांनीच गोवा महामार्गाच्या दुरवस्थेवरून सरकारला घरचा आहेर दिला आहे.

**संबंधित बातमी 6 वर**

# नेपाळमध्ये झालेल्या अपघातातील 25 भाविकांचे मृतदेह जळगावात नातेवाईकांचा आक्रोश

**प्रतिनिधी**
**जळगाव**

भुसावळ तालुक्यातील वरणगाव येथील तसेच तळवेल येथील आणि अन्य गावातील भाविक अयोध्या तसेच इतर देवस्थानाच्या देवदर्शनासाठी गेले होते. पण नेपाळ येथे देवदर्शनाला जात असताना 40 भाविकांनी भरलेली बस चालकाच्या चुकीमुळे खोल दरीत कोसळली आणि जागीच तब्बल 25 भाविक ठार झाले. जळगाव जिल्ह्यावर दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे. जळगाव विमानतळावर नेपाळ इथून 25 भाविकांचे मृतदेह दाखल झाले आहेत. याच 25



भाविकांसाठी 26 रुग्णवाहिका याच ठिकाणी उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. मयतांच्या नातेवाईकांसह नागरिकांनी मोठे गर्दी जळगाव विमानतळावर केली होती.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, पालकमंत्री अनिल पाटील मदत व पुनर्वसन मंत्री गुलाबराव अनिल पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन तसेच स्थानिक आमदार उपस्थित आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा उद्या जळगाव दौरा असल्याने जिल्ह्यात मोठा पोलीस फौजफाटा लावण्यात आला आहे.

कायदेशीर बाबींची पूर्तता करून प्रशासनाने नातेवाईकांच्या स्वाधीन मृतदेह दिले आहेत. यामध्ये एक मुलगी बेपत्ता असल्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी माहिती दिली आहे. सर्व मृतदेहांवर वरणगाव आणि तळवेल येथे अंत्यविधी करण्यात येणार आहेत.

# मोदींना शहेनशाह मॉडेल हवे होते, आम्ही त्यांना संविधान कपाळी लावण्यास भाग पाडले

**प्रतिनिधी**
**प्रयागराज**

विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले की, मोदीजींना राजा, महाराजा आणि शहेनशाह मॉडेल चालवायचे होते. पण मी मोदीजींना संविधान कपाळी लावायला भाग पाडले. राहुल पुढे म्हणाले की, मी भाजपला माझा गुरू मानतो. त्यांनी मला काय करावे, काय करू नये हे शिकवले.

राहुल सुमारे 40 मिनिटे बोलले. ते म्हणाले, देशभरात धोबी, मोची आणि सुतार यांचे जाळे आहे. त्यांच्या हातात प्रचंड कौशल्य आणि ताकद आहे. त्यांना स्पर्श करूनच हवा निघून जाते.

राहुल शनिवारी 24 ऑगस्ट रोजी प्रयागराज येथे पोहोचले आणि 'संविधानाचा आदर आणि संरक्षण' या कार्यक्रमात सहभागी झाले. त्यांनी सुलतानपूरच्या मोची रामचैत यांची कथा सांगितली. त्यांच्या हातात जबरदस्त कौशल्य असल्याचे सांगितले. ते 40 वर्षांपासून मोची म्हणून काम करतात. पण, त्यांचा कोणी आदर करत नाही.

राहुल म्हणाले, मी मोदीजींना अर्धा तास बोलताना ऐकले. मी त्यांना प्रश्न विचारला. तुम्ही ITI मध्ये सुताराची तयारी करत आहात. देशात



लाखो सुतार आहेत, तुम्ही त्यांना का तयार करत नाही? जर तुम्हाला न्हावी म्हणून प्रशिक्षण घ्यायचे असेल तर उत्तर प्रदेशातील नाईला विचारा आणि तो त्याच्या दुकानात नाईचे प्रशिक्षण देईल. देशात 10 लाख नाई तयार करायचे असतील तर देशातील नाईला पकडून सांगा, भाऊ, नाई तयार करा. 6 महिन्यांत लाखो नाई तयार होतील.

राहुल गांधी यांना आजी इंदिरा गांधींची आठवण काढली. ते म्हणाले, एके दिवशी एक पत्रकार माझ्याकडे मआला. मला म्हणाले की राहुल जी, मी पाकिस्तानच्या नेत्याला (मुर्शरफ किंवा नवाझ शरीफ) ओळखतो. मी त्यांना सांगितले आहे की तुम्ही भारत आणि पाकिस्तानमध्ये शांतता प्रस्थापित केली तर खूप चांगले होईल. शतकानुशतके लोक हे नाव लक्षात ठेवतील. त्यांचे बोलणे ऐकून

**पान 3 वर**

# यवतमाळमध्ये 'लाडकी बहीण' कार्यक्रमात गोंधळ, मुख्यमंत्र्यांनी मध्येच थांबवलं भाषण

**प्रतिनिधी**
**यवतमाळ**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमाचं यवतळामध्ये आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी मोठ्या प्रमाणावर स्थानिक महिलांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. यावेळी काही महिलांनी या कार्यक्रमात गोंधळ घातला. या महिलांना हटवण्यासाठी महिला पोलीस कर्मचारी पुढे आल्या आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला पण मोठ्याप्रमाणात गोंधळ झाला.

यवतमाळमध्ये लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम सुरु असताना उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांची भाषणं झाली. त्यानंतर शेवटी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे भाषणासाठी उभे राहिले, त्यांचं भाषण सुरु झाल्यानंतर



प्रेक्षकांमधील काही महिलांनी अचानक गोंधळ घालायला सुरुवात केली. फॉर्म भरुनही अद्याप आम्हाला पैसे मिळालेले नाहीत, अशी तक्रार या महिलांची होती.

मुख्यमंत्र्यांनी आपलं भाषण मध्येच थांबवलं आणि गोंधळ घालणाऱ्या दोन महिलांना स्टेजवर घेऊन या, असं आवाहन महिला पोलिसांना केलं. मुख्यमंत्र्यांचं भाषण सुरु असताना मध्येच हा प्रकार घडल्यानं काहीकाळ त्यांचं भाषण विस्कळीत झालं पण नंतर त्यांनी आपलं भाषण सुरुच ठेवलं.

आपल्या भाषणात त्यांनी पुन्हा एकदा सर्व लाभार्थी महिलांच्या खात्यात पैसे जमा होतील, याची खात्री दिली. तसंच विरोधकांवर टीका करताना त्यांनी कितीही या योजनेला विरोध केला तरी आम्ही ही योजना यशस्वी करुन दाखवू असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

## 25 ते 27 ऑगस्ट दरम्यान मुसळधार पावसाचा इशारा

**पालघर :** महाराष्ट्र किनारपट्टीपासून पूर्व मध्य अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाला असल्याने २४ ते २५ ऑगस्ट दरम्यान उत्तर कोकण आणि गुजरातच्या किनारपट्टी भागात ३५ ते ४५ किमी प्रतितास वेगाने वादळी वारे वाहण्याचा इशारा भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. २४-२७ ऑगस्ट दरम्यान पालघर जिल्ह्यात पूर्ण दिवस ढगाळ वातावरण राहून काही ठिकाणी जोरदार ते अति जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, त्यामुळे मच्छीमारांना पुढील तीन दिवस समुद्र किनारपट्टीवर आणि समुद्रात जावू नये असा सल्ला देण्यात आला आहे. तसेच कमाल आणि किमान तापमानात २-३ अंश सेल्सिअस घट होवून कमाल तापमान ३१ ते ३२ आणि किमान तापमान २४ ते २५ अंश सेल्सिअस राहण्याचा अंदाज देण्यात आला आहे. संपूर्ण जिल्ह्यात वाऱ्याचा वेग सरासरी १७ ते २२ किमी प्रति तास राहण्याचा अंदाज आहे, अशी माहिती कृषि विज्ञान केंद्र, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कोसबाड हिल येथील कृषि हवामान शास्त्रज्ञ रिझवाना सय्यद यांनी दिली.



## थोडक्यात

### साकुर आश्रमातील विद्यार्थिनीची गळफास लावून आत्महत्या

**जव्हार:** : साकुर येथील कन्या आश्रम शाळा येथे इयत्ता बारावीत शिकणाऱ्या १८ वर्षीय विद्यार्थ्यीनीने मंगळवारी गळफास घेऊन आत्महत्या केल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. आत्महत्या करण्याचे नेमके कारण अद्याप कळले नसून घडलेल्या घटनेची जव्हार पोलीस ठाणे येथे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार मार्फत आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या चांगल्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. मात्र ,तरीदेखील विद्यार्थी आत्महत्या प्रकार रोखण्यात प्रशासन सपशेल फोल ठरत असल्याची टीका पालक करीत आहेत. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अंतर्गत येणाऱ्या आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यूचे प्रमाण चिंतेची बाब ठरत आहे. विशेष म्हणजे चालू शैक्षणिक वर्षात शाळा व आश्रमशाळा सुरू झाल्यापासून आजतागायत एकट्या जव्हार आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अंतर्गत येणाऱ्या देहरे , पळसुंडा,साकुर, विनवळ, खुडेद अशा आश्रम शाळेत १० विद्यार्थ्यांचे मृत्यू झाल्याची आकडेवारी ही एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार यांनी दिली आहे. पुढील तपास सुरू असल्याचे जव्हार पोलीस ठाणे येथून सांगण्यात आले आहे. (

### ऑनलाइन ट्रेडिंगच्या नावाखाली लाखोंची फसवणूक

**बोईसर :** 'ऑनलाइन ट्रेडिंग'च्या नावाखाली लाखो रुपयांच्या फसवणुकीचे प्रकार बोईसरमध्ये उघडकीस आले आहेत. समाजमाध्यमावर 'ॲप'ची 'लिंक' पाठवून त्याद्वारे एका व्यक्तीची फसवणूक झाली आहे. या प्रकरणी बोईसर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'मॉर्गन ३ इंडिया स्टॉक रिसर्च सेक्टर' आणि 'मॉर्गन व्हीआयपी ७९००' या व्हॉट्सॲप ग्रुपचे ॲडमिन अमित गोले आणि सलमान शहा यांनी बोईसरजवळील टाटा हाउसिंग येथील निवासी आणि एका खासगी कंपनीचे व्यवस्थापक चंद्रिकाप्रसाद प्रजापती यांना ग्रुपमध्ये सभासद म्हणून घेतले. यानंतर 'एमटीके' नावाच्या 'ॲप'ची 'लिंक' पाठवून ती 'डाऊनलोड' करायला सांगून त्याद्वारे वेगवेगळ्या ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवायला सांगून चांगली सूट व भरघोस परतावा, देण्याचे आमिष दाखविण्यात आले आरोपींनी फिर्यादी चंद्रिकाप्रसाद प्रजापती यांच्याकडून वेळोवेळी जवळपास ३९ लाख ९० हजार रुपये रक्कम गुंतवणूक म्हणून घेतली. मात्र त्यानंतर आरोपींनी फिर्यादी यांना गुंतवणुकीचा परतावा न देता 'सेबी'ने तुमचे ट्रेडिंग खाते गोठवल्याचे सांगत गुंतवणूक केलेली रक्कम परत न करता आर्थिक फसवणूक केली. या फसवणुकीप्रकरणी चंद्रिकाप्रसाद प्रजापती यांनी बोईसर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया ॲंड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# महाविकास आघाडीचे भरपावसात निषेध आंदोलन

## मोखाडा, जव्हार ,विक्रमगड वाडा तालुक्यात काळयाफिती लावून आंदोलन

प्रतिनिधी
**मोखाडा**

राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे बदलापूर येथील एका शाळेतील दोन चीमुकल्यांवर अत्याचार झाल्याची घटना घडली या घटनेचे पडसाद देशभर उलटले यासाठी महाविकास आघाडीने काल राज्यात बंद पुकारला होता यांनतर या बाबत जिल्हयातील सर्व तालुक्यात बंदचे आवाहन आणि निवेदनही देण्यात आले. मात्र ऐनवेळी न्यायालयाने बंद बेकायदा असल्याचे सांगितल्या नंतर मविआ ने सायंकाळी बंद न करता निषेध व्यक्त करण्याचे आवाहन केले याला पालघर जिल्हयातील मविआ कडून जोरदार प्रतिसाद देत सर्व तालुक्यात भर पावसात हे आंदोलन करण्यात आले यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष आमदार सुनील भुसारा यांच्या नेतृत्वाखाली सर्व मविआ पदाधिकारी यावेळी सामील झाले होते.



बदलापूर घटनेच्या निषेधार्थ मविआने बंद मागे घेत काळया फिती लावून भरपावसात हे आंदोलन केले मोखाडा तालुका बस स्थानकावर तिन्ही पक्षाच्या पदाधिकार्यांनी काळयाफिती लावून सरकार च्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली यावेळी लाडक्या बहिणीला पैसे नको संरक्षण हवे, महायुती सरकार मुर्दाबाद, निष्क्रीय सरकारचे करायचे काय खाली डोके वर पाय अशा घोषणा देवून सरकारचा निषेध करण्यात आला. याबाबतचे निवेदनही मोखाडा पोलिसांत देण्यात आले याप्रमाणे जव्हार विक्रमगड वाडा या तालुक्यातही हे आंदोलन करण्यात आले यावेळी आमदार भुसारा यांनी सरकारचा निषेध करीत हे सरकार फक्त फसव्या योजना आणत आहे मात्र आई बहिणींचे संरक्षण करण्यास हे सरकार अपयशी ठरत आहे. यामुळे या निर्दयी सरकारला आता जनता सत्तेपासून खाली खेचल्याशिवाय राहणार नाही.

यावेळी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष जमशीद शेख यांनी महाविकास आघाडी एकत्रपणे एकदिलाने लडत असून हम सब एक है म्हणत सरकार विरोधात जोरदार घोषणा दिल्या यावेळी राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद कोठेकर, कॉंग्रेस आदिवासी सेलचे जिल्हाध्यक्ष अशोक पाटील, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख दिलीप मोहंडकर, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## पालिकाअंतर्गत रस्ते भरकटलेले

# नामनिर्देशक फलकांचा पालिकेला विसर

**वसई**

वसई -विरार शहर महानगरपालिकेची स्थापना होण्याआधी अस्तित्वात असलेल्या नगरपरिषदांच्या काळात विविध रस्त्यांच्या माहितीसाठी नामनिर्देशन फलक लावण्यात आले होते. मात्र आत्ताच्या पालिका प्रशासनाच्या काळात हे नामनिर्देशन फलक विविध रस्त्यांवरून गायब झाले असल्याने वाहनचालकांवर रस्ते भरकटण्याची वेळ ओढवते.

वसई- विरारचे क्षेत्र अलिकडे मोठ्या प्रमाणात विस्तारले आहे. पालिका हद्दीतील. मुख्य रस्त्यांना जोडून गावपाड्यांत तसेच विविध चौकांत अनेक लहान मोठे रस्ते जात आहेत. मात्र या रस्त्यांच्या ठिकाणी नामनिर्देशन फलकांचा विसर पालिकेला पडला असल्याने नागरिकांना व वाहनचालकांना मोठ्या प्रमाणात अडचणिंचा सामना करावा लागत आहे. वसईचे औद्योगिक क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने जिल्ह्याबाहेरील मोठा नोकरवर्ग येथे ये-जा करतो. शाळा-महाविद्यालये मोठ्या प्रमाणात असल्याने येथे विद्यार्थ्यांची देखील ये-जा असते. मात्र बऱ्याचदा रस्त्यांच्या ठिकाणी नामफलक नसल्याने ते भरकटतात. तत्कालीन नवघर-माणिकपूर नगरपरिषदेने रस्त्यांवर नामनिर्देशन फलक लावले होते. मात्र आत्ताच्या पालीकेला त्याचा विसर पडला आहे. दरम्यान, अनेक रस्त्यांवर नामनिर्देशन फलक नाहीत, काही ठिकाणी आहेत ते तुटलेले आहेत. तर काही ठिकाणी हे फलक झुडपांच्या आड गेले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना रस्त्याअभावी भरकटायला होते.

# शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरींचा जवाहर नवोदय विद्यालयात दौरा

प्रतिनिधी
**पालघर**

जवाहर नवोदय विद्यालय ही केंद्र शासनाची संस्था असून या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणारे शिक्षण उत्तम दर्जाचे आहे. असे केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता व शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी सांगितले.

माहिम येथील जवाहर नवोदय विद्यालय येथे केंद्रीय राज्यमंत्री चौधरी यांनी भेट देऊन शाळेची पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी खासदार डॉ. हेमंत सवरा, जिल्हाधिकारी , पोलीस अधिक्षक , माहिम येथील जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य तसेच वरिष्ठ अधिकारी, विद्यालयाचे शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. जवाहर नवोदय विद्यालयामध्ये आधुनिक पद्धतीने विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येत असून या विद्यालयातील विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचे नाव उज्वल करत आहेत. असेही श्री. चौधरी यांनी सांगितले. श्री. चौधरी यांनी विविध देशांमध्ये विविध क्षेत्रात उच्च पदावर काम करणाऱ्या या विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांशी दूरदृष्य प्रणाली द्वारे संपर्क साधून चर्चा केली. यावेळी जवाहर नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध विषयाचे सादरीकरण केले.

## जुन्या नादुरुस्त बसमुळे प्रवाशांचे होतात हाल...!

# भाजप युवा मोर्चा तालुका अध्यक्षांनी महामंडळाला दिले निवेदन

प्रतिनिधी
**मोखाडा**

'प्रवाशांच्या सेवेसाठी'हे ब्रीदवाक्य असले तरी जव्हार आगाराच्या बसेस प्रवाशांना सेवा देण्यास कमी पडत असल्याचे चित्र आहे.अनेक बस जुनाट असल्याने कुठे कधीही ब्रेक डाऊन होतात आणि त्याचा सर्वच प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो सातत्याने बंद होणाऱ्या बसेसमुळे प्रवाशांकडून नाराजी व्यक्त करण्यात येते



मागील एक ते दीड वर्षाच्या दरम्यान एसटीने काही नवीन 'प्रवासी योजना' आणत बस व्यवस्था सुरळीत करण्याचा प्रयत्न केला.त्यास प्रवाशांनीही खास करून महिलावर्गाने चांगला प्रतिसाद दिल्याने बस गतिमान होऊ लागली असताना आगारातून निघणाऱ्या बसेस सुस्थितीत आहेत का? याची शहनिशा होण्याची गरज आहे.परंतु आगारातून निघणाऱ्या बसेस चांगल्या अवस्थेत आहे की नाही याची खात्री करून दिल्या जातात की नाही हा प्रश्न उद्भवत आहे.याचा त्रास प्रवाशांसह चालक वाहकांनाही सहन करावा लागत असल्याचे चित्र आहे. जव्हार आगाराचे काम काही जुन्या बसेसवर चालू आहे.त्यामुळे त्यांचे ब्रेकडाऊन होण्याचे प्रमाण वाढत आहे.छप्पर गळणे,स्टिअरिंग ऑइल नाही,गिअर पडत नाही.रेडीएटरमध्ये पाणी नाही.टायरांची दुरवस्था,स्टार्टर खराब झाल्यामुळे धक्का मारण्याची वेळ येणे,फॅन बेल्ट नसल्याने मशीन गरम होणे या बाबी नेहमीच्याच झाल्या आहेत.यामुळे नवीन बस नसल्याने लांब पल्ल्यासाठीही जुन्याच बस वापराव्या लागत आहेत."लांब पल्ल्याच्या बसेस तरी चांगल्या दर्जाच्या असाव्यात.अर्ध्या रस्त्यावर बस नादुरुस्त झाल्याने प्रवासी तसेच लहान मुलांचे, वयोवृधांचे,विद्यार्थ्यांचे भर पावसाळयात खूप हाल होऊन मनस्ताप सहन करावा लागतो.

जव्हार आगार क्षेत्रातील प्रवाशांच्या तक्रारींची दखल घेत पालघरचे खासदार डॉ.हेमंत सवरा तसेच भाजपा मोखाडा तालुका अध्यक्ष संतोष चोथे यांच्या आदेशानुसार जव्हार आगार एस.टी महामंडळ कार्यालय जव्हार येथे भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष नरेंद्र चौधरी, भाजपा मोखाडा तालुका अध्यक्ष संतोष चोथेयांनी निवेदन दिले.

# पेसा नोकरभरतीसाठी ठाणे-पालघर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग बंद, तलासरी बंद!



प्रतिनिधी
**पालघर**

पेसा कायद्यानुसार आदिवासी 17 संवर्गाच्या नोकरभरती झाल्या पाहिजेत म्हणून नाशिक येथे 1 ऑगस्ट 2024 रोजी पासून आमरण उपोषण सुरू आहे. त्यास पाठिंबा म्हणून 23 ऑगस्ट 2024 रोजी डहाणू तालुक्यातील चारोटी नाका येथे मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 या ठिकाणी डीवायएफआय युवा संघटना तसेच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, किसान सभा, कष्टकरी संघटना, इतर आदिवासी संघटना, यांच्या वतीने हजारों लोकांचा रस्ता रोको करण्यात आला.या वेळी डहाणू मतदारसंघाचे आमदार कॉम्रेड विनोद निकोले, विक्रमगड मतदारसंघाचे आमदार सुनील भुसारा, कष्टकरी संघटनेचे नेते , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव डीवायएफआय चे राज्य अध्यक्ष व जिल्हा, राज्य कमिटी सदस्य , किसान सभेचे नेते रडका कलांगडा,अक्षय दवणेकर, सीटूचे नेते, तसेच माकप व इतर पक्षांचे लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

या पेसा भरती आंदोलनाला पाठिंबा म्हणून 24 ऑगस्ट 2024 रोजी शहीद राजगुरू यांच्या जयंतीदिनी तलासरी तालुक्यातील तलासरी व उधवा बाजारपेठ 100% बंद ठेवून व्यापारी वर्गानेही चांगला प्रतिसाद दिला.



**मुंबई ।** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गोरेगाव विधानसभा विभाग अध्यक्ष विरेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गोरेगाव पूर्व रेल्वे स्थानक येथे बदलापूर येथील बाल लैंगिक शोषण प्रकरण विरोधात निदर्शने आंदोलन आणि महिला व मुली यांची सुरक्षा अबाधित राहण्याकरिता कठोर कायदा तत्काळ पारित झालाच पाहिजे याकरिता स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली यावेळी सर्व महिला पुरुष पदाधिकारी उपस्थित होते. महिला व नागरिकांनी सह्या देऊन या अत्याचाराविरुद्ध आपला राग व्यक्त केला.

# गणेशोत्सवाची लगबग जोरात

## मुंबई-ठाण्यातून गणेशमुर्त्यांचे वसईत आगमन ; यंदा बाप्पांचे आगमन खड्ड्यात

प्रतिनिधी
**वसई**

गणेशोत्सव अवघा चौदा दिवसांवर आला असून, गणेशाच्या आगमनासाठी सर्वत्र लगबग सुरू आहे. घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये सजावटीपासून ते देखाव्यांची तयारी करण्यात धामधूम सुरू आहे. सजावटीच्या साहित्य खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये गर्दी हळुहळू वाढत आहे. मंडळांचा देखाव्यांच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करण्याचा प्रयत्न आहे. अनेक मंडळांनी तर यंदा कमी उंचीची गणेशमूर्ती बसविण्यासह पाणी प्रदूषण होऊ नये यासाठी खास नियोजन केले आहे. असे चित्र असले तरी यंदा रस्ते खड्डेमय असल्याने बाप्पांचे आगमन हे खड्ड्यातून होत असल्याने त्यांच्यात भाविकांत नाराजीचे वातावरण आहे.

अवघ्या दोन आठवड्यांवर आलेल्या बाप्पाच्या स्वागतासाठी सगळीकडेच लगबग सुरू झाली आहे. मुंबई-ठाण्यातून सार्वजनिक मंडळे गणेशमुर्त्या आणत आहेत. तर लाडक्या बाप्पाच्या आगमनासाठी सार्वजनिक व घरगुती देखावे साकारण्याचे काम हाती घेतले आहे. देशात व राज्यात स्त्रियांवरील अत्याचारांत कमालीची वाढ झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर स्त्री अत्याचाराचे देखावे साकारण्याचे काम सुरू आहे. तसेच बाजारपेठेत बाप्पाच्या पूजेसाठी लागणारे साहित्य आत्तापासूनच खरेदी करण्याचे काम सुरू आहे. मुर्त्या आगाऊ खरेदी करण्यासाठी भाविकांची गणेश कारखान्यांत रिघ लागली आहे. तर उत्सवासाठी बाजारपेठा सजू लागल्या आहेत.

वसईत ठिकठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून मंडप उभारण्याचे काम सुरू झाले असून त्यात विविध सामाजिक संदेश देणारे देखावे साकारण्याचे काम सुरू आहे. यंदा रस्त्यात खड्ड्यांचे विघ्न असल्याने गणेश मुर्त्या आणताना भाविकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

**जाहीर सूचना**

सर्व संबंधितांच्या निर्दर्शनास आणून देण्यात येत आहे की माझे अशिल नामित १) **श्री. सचिन यल्लना नरकोरोल्लू २) शांता बलराज सुनके** येथे राहणारः सदनिका क्र. ३११, तिसरा मजला, अष्टविनायक सीएचएस लि., विरार रोड, विजय नगर, नालासोपारा पूर्व, ता-वसई जिल्हा पालघर ४०१२०९ राहतात. ते मयत शांता बलराज सुनके यांचे दिनांक ०६/१२/२०२३ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चात केवळ माझ्या अशिलांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारसा नाहीत.

मालमत्तेचा तपशिलः सदनिका क्र. ३११, ३ रा मजला, अष्टविनायक सीएचएस लि., विरार रोड, विजय नगर, नालासोपारा पूर्व, ता-वसई जिल्हा पालघर ४०१२०९. वसई विरार शहर महानगरपालिका अधिकारक्षेत्रामधील गावः तुळींज येथील मोजमाप साधारणपणे २९५.९ चौ./फू. (२७.५ चौ./मी.) मोजमाप असलेल्या सर्वे क्र. २५, हिस्सा क्र. ६.

मी सदर मालमत्ता अन्य कोणी त्रयस्थ पक्षकारांना लवकरात लवकर विकू इच्छित आहे.

उपरोक्त नमूद जागेसंदर्भात कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही दावे किंवा कोणत्याही प्रकारे हरकती असल्यास सदर जाहीर सूचना प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या आत कळवावे. असे जर न झाल्यास नमूद विषयांकित मालमत्तेवर कोणताही कायदेशीर अडथळा/हरकत नाही असल्याचे समजण्यात येईल.

ठिकाण: वसई
दिनांक: २५/०८/२०२४
सही/-
**अवधेश कुमार बिंड**
वकील, उच्च न्यायालय, मुंबई

**उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय**
**प्रशासकीय इमारत, १ वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पू), मुंबई-४०००५१.**
दूरध्वनी ०२२-२६५१०१३६ Email ID sdomsdest@gmail.com

**क्र. आरटीएस एसआर-३१/२०२३**

सुनावणीची नोटीस
श्री. रघुनाथ नवशा मेरे (मयत)
श्रीमती गंगुबाई रघुनाथ मेरे (मयत)
श्रीमती मिनाक्षी आनंद मेरे (सुन) व इतर
मेरे चाळ, विश्वेश्वर नगर, ऑफ आरे कॉलनी,
सेंट पावस कॉलेज समोर, गोरेगाव (पू). मुंबई-४०००६३ **.. अपिलार्थी**

**विरुद्ध**

२. श्री. मुरली बलदेव (भैव्या) उपाध्याय (मयत) यांची पत्नी श्रीमती रामदेवी मुरली उपाध्याय यांचे वारस
२/१) श्री. रामशेर रामप्यारे उपाध्याय (नात)
२/२) श्री. यदुनाथ मुरली उपाध्याय (मुलगा)
२/३) श्री. लालबहादुर मुरली उपाध्याय (मुलगा)
सर्व रा. फ्लैट नं. ५०३, ५०४, ५ वा मजाला, बि.नं. ७. सेक्टर नं. ५. शांती गार्डन, मिरा रोड, पूर्व, जिल्हा ठाणे-४०११०७

४. श्री. धिरजलाल एम. दोषी (मयत) यांचे वारस
३/९) श्री. अनील धिरजलाल दोषी
३/२) श्री. दिलीप धिरजलाला दोषी
३/३) श्री. भूपेश धिरजलाल दोषी
३/४) श्री. किरीट धिरजलाल दोषी
३/५) श्री. भागीरथ धिरजलाल दोषी
३/६) श्री. पल्लवी प्रफुल व्होरा
सर्व रा. प्लॉट नं. २५०/३, जवाहर नगर, गोरेगाव (प), मुंबई-४०००६२ **...प्रतिवादी**

विषयः- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये दाखल अपिल

अपिलाधर्थी यांनी मौजे एक्सर पहाडी, ता. मोरीवली येथील स. क्र. २१. व स.क्र. २२ या मिळकतीसंदर्भात फेरफार क्रमांक ७२, दि. २०/०१/२०२३ विरुध्द या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. सदर अपिलावर सुनावणी दि.०६/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयात होणार आहे.

उपरोक्त दिवशी आपण स्वतः किंवा प्राधिकृत वकोलामार्फत आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित रहावे. वरील तारखेस आपण हजर न राहिल्यास किंवा आपणामार्फत लेखी अथवा तोंडो जवाय युक्तीवाद सादर न केल्यास आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन कागदपत्रांच्या गुणवत्तेनुसार अपिल प्रकरणात आदेश पारीत करण्यात येतील, याची नोंद घ्यावी

**ठिकाण:-बांद्रे (पूर्व)**
**दिनांक:-२२/०८/२०२४**

**सही/-**
**(डॉ. भागवत गावंडे)**
**उपविभागीय अधिकारी**
**मुंबई पश्चिम उपनगर**

**जाहीर सूचना**

या जाहिर सुचनाद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. वसंत काका गोरड रा. उमेळमान ता. वसई यांचेकडून त्यांनी खरेदी केलेली जमिन मिळकत ज्यास स.नं. ७५ हि. नं. १४ पैकी क्षेत्र - ०.०६.६ हे. आर.चौ. मी. पो. ख.०.००.२० हे. आर.चौ. मी. एकूण क्षेत्रः ०.०६.८० हे.आर.चौ. मी. आकार १.२५ रू. पै. त्यापैकी माझ्या अशिलांच्या हिश्याचे क्षेत्रः-०.०२.५० हे. आर. चौ. मी. आकार ०.४७ रु. पै. चे नोंदणीकृत दस्त क्र. ४८३०/२००४ दि. २३/०८/२००४ रोजीचा सह दुय्यम निबंधक वसई- १ यांच्या कार्यालयात निष्पादीत केलेला मुळ दस्त हा गहाळ झालेले असून शोधण्याचा सर्व प्रयत्न करून सुध्दा सापडलेले नाही.

तरी जर कोणत्याही व्यक्तीस मुळ दस्त सापडल्यास खालील दिलेल्या पत्यावर कळवून आणून द्यावे किंवा जर कोणत्याही व्यक्तीस किंवा बँकेचा /संस्थेचा सदर जमिन मिळकतीवर आणि मुळ दस्तावर हक्क, अधिकार, हितसंबध, दावा, गहाण, दान, वारसा, साठेकरार, तारण व अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास त्यांनी खालील कार्यालयीन पत्यावर नमुद वेळात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसाचे आत कागदपत्रासह हरकत घ्यावी अन्यथा न घेतल्यास कोणाचा कोणताही अधिकार नसल्याचा गृहित धरून त्याप्रमाणे नाहरकतीचा दाखला देणेत येईल याची नोंद घ्यावी.

**ठिकाण:-वसई**
**दिनांक:- २५/०८/२०२४**

**सही**
**(ॲड. जावेद अन्सारी)**
**कार्यालयीन पत्ता:- फ्लॅट नं.२, दिप सागर अपार्टमेन्ट, सिध्दी विनायक नगर, सेक्रेर्ड हार्ट स्कूल जवळ, नालासोपारा प. ता. वसई, जि. पालघर ४०१२०३**
**मो. क. ७९७७४६५८२६**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 66**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया ॲंड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया ॲंड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ६६**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## गोविंदांच्या संरक्षणावर भर

**मुंबई ।** महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यभरातील गोविंदांना विमा संरक्षण दिले जाते. यंदादेखील हे विमा संरक्षण दिले जात असून आतापर्यंत ६५ हजार गोविंदाना विमा संरक्षण देण्यात आले आहे. काही तांत्रिक कारणांमुळे विमा संरक्षण मिळाले नसल्यास सबंधित गोविंदाना ते मिळवून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशनचे अध्यक्ष बाळा पडेलकर यांनी सांगितले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशनच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गोविंदांना विमा संरक्षण दिले जाते. दरवर्षीप्रमाणे यंदाही विमा संरक्षणाची मोहीम तीव्र करण्यात आली आहे. राज्यभरातील ७५ हजार गोविंदांना मोफत विमा संरक्षण योजनेमध्ये आतापर्यंत ६५ हजारपेक्षा जास्त गोविंदांचे मोफत विमा संरक्षण झाले आहे. आणखी २५ हजार गोविंदांच्या विमा संरक्षणासाठी 'महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन'कडून प्रस्ताव देण्यात आला आहे.



# 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेतील सर्व पात्र महिलांना लाभ मिळणार

प्रतिनिधी
■ मुंबई

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अर्जांची पडताळणी प्रक्रिया सातत्याने सुरू आहे. ज्या महिलांनी ३१ जुलै पर्यंत अर्ज केला होता, त्या पात्र महिलांना लाभ देण्यात आला आहे. ३१ जुलै नंतरच्या अर्जांची पडताळणी प्रक्रिया सुरू असून या महिलांना लवकरच लाभ मिळणार असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

मंत्री कु.तटकरे म्हणाल्या की,






ज्या महिलांनी ३१ जुलै नंतर अर्ज केला आहे. त्या अर्जांची पडताळणी प्रक्रिया जिल्हास्तरावर सुरू आहे. जिल्हास्तरावरील प्रशासकीय मान्यता होऊन पात्र महिलांचा डेटा विभागाकडे येतो. त्यानंतर ही यादी लाभ देण्यासाठी बँकेकडे पाठवली जाते. त्यामुळे लवकरच ३१ जुलै नंतरच्याही पात्र महिलांना लाभ मिळणार आहे.

आतापर्यंत राज्यभरातून या योजनेसाठी २ कोटी ६ लाख १४ हजार ९९० अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी १ कोटी ४७ लाख ४२ हजार ४७६ अर्ज पात्र ठरले आहेत. तर ४२ हजार ८२३ अर्जांची पडताळणी सुरू आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला' राज्यात उत्तम प्रतिसाद मिळत आहे.आपल्या बँक खात्याला आधार लिंक करून घ्यावे, आणि जास्तीत जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंत्री कु.तटकरे यांनी केले आहे.

पान 1 वरुन

### 'एमएमआर' हे विकसित भारताचे पॉवर हाऊस ठरेल : मुख्यमंत्री

करेल, असे नियोजन आहे. यातून मोठ्या लोकसंख्येला मागणीनुसार घरे उपलब्ध करून देता येणार आहेत. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेच्या दोन्ही बाजूला सहापदरी सेवा रस्त्यांची बांधणी करण्यात येईल. ज्यामुळे या रस्त्यावरील वाहतुकीचा वाढता ताण कमी करता येणार आहे. गोरेगांव-ठाणे टनेल आणि सिंहगड रस्ता विकास यांच्यामुळे महत्वाची विकास क्षेत्रांना जोडणारी दळणवळण सुविधा उपलब्ध होणार आहे. कोस्टल रोड मेट्रो आणि मेट्रो लाईन – ५ या महत्वांकाक्षी प्रकल्पांमुळे प्रवाशी वाहतूक सुविधेत मोठी सुधारणा होईल, यासाठी सुमारे १ हजार २७० कोटी डॉलर्सची तरतूद केली जाणार आहे. मुंबईतील बस सेवेचे आधुनिकीकरण करताना या संकल्पनेचाही अवलंब केला जाईल. यातून २०३१ पर्यंत अतिरिक्त दोन लाख प्रवाशी वाहतुकीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण, वाढवण बंदर, दिघी आणि रेवस या ठिकाणच्या बंदर सुविधांच्या विकासावर भर देण्याचे नियोजन आहे. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार-उदीमाला प्रोत्साहन मिळेल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून वाहतूक (२०० कोटी डॉलर्सची गुंतवणूक) सुरु झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी होणार आहे. याशिवाय प्रदूषण आणि अन्य समस्या दूर होणार आहे. याशिवाय २०३२ पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाचे विस्तारीकरणही करण्यात येणार आहे. या विस्तारीकरणामुळे दरवर्षी आणखी सहा कोटीं प्रवाशांना वाहतूक सुविधांचा लाभ घेता येणार आहे. एमटीएचएल, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारा - कोस्टल रोड, वडोदरा महामार्ग यांसह भारतमाला परियोजना टप्पा-३ च्या कामांमुळे मोठी गूंतवणूक होणार आहे. मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर या प्रकल्पामुळे देशातील आर्थिकदृष्ट्या दोन महत्वाची शहरे जोडली जाणार आहेत.

# चांदिवलीमध्ये बदलापूर व कोलकत्ता घटनेच्या निषेधार्थ काँग्रेसचा मुक मोर्चा

प्रतिनिधी
■ मुंबई

काल काँग्रेस वर्किंग कमिटी सदस्य व प्रदेश काँग्रेस कार्याध्यक्ष मो. आरिफ (नसीम) खान यांच्या नेतृत्वाखाली बदलापूर व कोलकत्ता मध्ये घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ चांदिवली विधानसभेत मूक निषेध मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये अनेक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, महिला संघटनांचे प्रतिनिधि तसेच हजारोच्या संख्येने काँग्रेसचे महिला व पुरुष कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.



या मूक निषेध मोर्चात मुंबई प्रदेश उपाध्यक्ष शरीफ खान, महासचिव प्रभाकर जावकर, रामगोविंद यादव, जिल्हाध्यक्ष रॉय मनी, अखिल भारतीय युवक काँग्रेस सचिव सुरभी दिवेदी, समीर अख्तर, शरद पवार, वजीर मुल्ला, भाऊ शेट्टी, चांदिवली महिला तालुका अध्यक्ष राधिका पवार, माजी नगरसेविका सविता पवार, शकिला अंसारी, राष्ट्रवादी मुंबई महासचिव बाबू बत्तेली, यांच्यासह चांदिवली तालुक्यातील सर्व महिला कार्यकर्ते पुरुष ब्लॉक अध्यक्ष सहित हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते व स्थानिक लोक उपस्थित होते.

कार्यक्रम संपल्यानंतर पत्रकाराशी बोलताना नसीम खान म्हणाले की, राज्याचे महायुती सरकार महिलांच्या सुरक्षेबद्दल अजिबात संवेदनशील नाही. पोलीस प्रशासन व सरकार अशा घटना गंभीरपणे घेत नसल्यामुळे ठाणे, मुंबई सहित संपूर्ण राज्यात महिला व लहान-लहान मुलीवर अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस घडत असून त्यातून अशा घटना वाढत आहेत.असे सांगून असे कृत्य करणाऱ्या नराधमावर कठोर कारवाई करावी आणि महाराष्ट्रातील महिला व मुलीना सुरक्षा द्यावी हीच त्याच्याकरिता त्यांच्या लाडक्या भावाकडून सप्रेम भेट मिळावी अशी अपेक्षा नसीम खान यांनी व्यक्त केली.

# जोगेश्वरीमध्ये मुक आंदोलनात घोषणा देत महिलांनी घटनेचा केला निषेध

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस आणि अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या प्रवक्त्या भावना शर्मा जैन यांच्या नेतृत्वाखाली हजारो महिलांनी वर्सोवा विधानसभेच्या जोगेश्वरी पश्चिम येथील बहराम बाग ब्लॉक येथे एका निरपराध व्यक्तीवर झालेल्या अत्याचाराच्या विरोधात निषेध मोर्चा काढला.

बदलापूरमधील मुलगी. यावेळी बोलताना भावना शर्मा जैन म्हणाल्या की, निष्पाप मुलीवर



बलात्कार करणाऱ्या सैतानाला तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी. असे कृत्य करण्याचे धाडस कोणीही करू नये आणि असे कृत्य करण्यापूर्वी 100 वेळा विचार व्हावा यासाठी अशा निंदकाला जाहीरपणे फाशीची शिक्षा द्यावी, असेही ते म्हणाले. पुढे त्यांनी महाराष्ट्र सरकारलाही धारेवर धरले आणि हे सरकार सर्व काही बंद डोळ्यांनी पाहत आहे, आज महाराष्ट्रात सर्वत्र महिलांवर अत्याचार होत आहेत.

महाराष्ट्राची कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे, आंबोलीत ३ महिन्यांपूर्वी एका अकरा वर्षांच्या मूकबधिर मुलीवर बलात्कार झाला, तिचा आरोपी आजतागायत पकडला गेला नाही, हा रानटीपणा, ही घृणास्पद बाब, असा नवा खुलासा त्यांनी केला. या सरकारने महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाचा तात्काळ राजीनामा द्यावा, भावना शर्मा जैन यांनी आज बहरबाग नाक्यावर निदर्शने करताना या गोष्टी सांगितल्या.

## दहीहंडीची रक्कम रुग्णांच्या मदतीसाठी



■ मुंबई

दहीहंडी उत्सव एक इव्हेंट झाला आहे. लाखो रुपये खर्च होत आहेत. मात्र हे लाखो रुपये गोरगरीब रुग्णांच्या उपयोगी आले तर ? हा विचार घेऊन दहीहंडी कार्यक्रमाचे अडीच लाख रुपये गोरगरीब रुग्णांच्या उपयोगी आणण्यात येणार आहेत.

समाजसेवक भिमराव धुळप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपविभागप्रमुख यशवंत विचले यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमातील दहीहंडीच्या पथकाची संख्या १०० वरून २५ करत शिल्लक ७५ पथकाची बक्षीस रक्कम गरीब रुग्णांना देण्यात येणार आहे.

अडीच लाख रुपये असणारी ही रक्कम थोडी वाटत असली तरी एक नवा पायंडा आम्ही पाडत आहोत असे सांगत धुळप म्हणाले, असे जर सर्वच दहीहंडी आयोजकांनी केले तर एक चांगले समाज उपयोगी कार्य होईल. २७ ऑगस्ट रोजी मुंबईतील दादर मध्ये केशवराव दाते मैदान येथे दहीकाला उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

## लालबागमध्ये गणेशोत्सवाची लगबग

प्रतिनिधी
■ मुंबई

वर्षभर आतुरता असलेला गणेशोत्सव आता काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. कोकणातील चाकरमान्यांची गावी जाण्याची तयारी सुरू आहे. लालबागमध्ये गणेशोत्सवाची लगबग सुरू असून साहित्याच्या खरेदीसाठी मुंबईकर गर्दी करीत आहेत.कामातून वेळ काढून शनिवार आणि रविवारी मुंबईकरांनी बाप्पाच्या खरेदीला सुरुवात केली आहे. सजावटीचे साहित्य, लाडू, पेढे, मसाल्यांची खरेदी लालबागच्या बाजारात सुरू आहे. दरम्यान, येथील मोठे व्यापारी बाप्पाच्या आगमनानंतर किंवा एक दिवस आधीपासूनच सुटीवर जाणार आहेत. 'लालबागचा राजा'च्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. पुणे, गुजरात, संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक येतात. शिवाय, व्हीव्हीआयपी, सेलिब्रिटीही बाप्पाच्या दर्शनासाठी दाखल होतात. या गर्दीमुळे इथले दुकानदार आपली पारंपरिक दुकाने बंद करून ११ दिवस दुसरा व्यवसाय करतात.

## लॉटरी विक्रेत्यांची दिल्लीत थेट धडक

# मुंबईसह महाराष्ट्रातील रेल्वे स्थानकांवर लॉटरी केंद्र



प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईसह महाराष्ट्रातील प्रत्येक रेल्वे स्थानकांवर रेल्वे मंत्रालयाने विशेष बाब म्हणून लॉटरी केंद्रासाठी परवानगी द्यावी अशी जोरदार मागणी लॉटरी विक्रेत्यांचे जेष्ठ नेते श्री विलास सातार्डेकर यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने रेल्वे मंत्रालयाकडे नवी दिल्लीत केली असून या मागणीसाठी सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रवनित सिंग यांच्याकडे एका निवेदनाद्वारे मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व रेल्वे स्थानकांवर आठ बाय बारा फुट आकाराच्या लॉटरी स्टॉल उभारण्यास परवानगी द्यावी असा प्रस्ताव सादर करण्यात आला गर्दीच्या रेल्वे स्थानकांवर सहज लॉटरी तिकीटे त्यामुळे उपलब्ध होतील. ग्राहकांना बक्षिसे विक्रेत्यांना रोजगार सरकारला महसूल आणि रेल्वे मंत्रालयाला भाडे उपलब्ध होणार आहे. अशा केंद्रामुळे राज्यभरातील बेरोजगारांना रोजगार मिळणार असून लाखो कुटुंबीयांना दिलासा मिळेल यासह अनेक मुद्यांवर सविस्तर चर्चा ही रेल्वे अधिकारी पंकज खन्ना यांच्याशी शिष्टमंडळाने केली. पश्चिम रेल्वे विभागाचे व्यवस्थापक नीरज वर्मा तसेच मध्य रेल्वे विभागाचे व्यवस्थापक रजनीश गोयल यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येणार असून रेल्वे मंत्रालयातील प्रशासकीय विभाग या मागणीवर गंभीरपणे पावले उचलणार आहेत.

नवी दिल्ली येथील रेल भवनात महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता सेनेचे संस्थापक अध्यक्ष श्री विलास सातार्डेकर यांच्या सह सरचिटणीस राजेश बोरकर, उपाध्यक्ष कमलेश विश्वकर्मा, डॉ. मनीष गवई, कमल सैनी या शिष्टमंडळाचा सहभाग होता. रेल्वे मंत्रालयाच्या सेवाभावी उपक्रमांबद्दल शिष्टमंडळाने कौतुक केले आणि भावी वाटचालीला शुभेच्छा दिल्या.

# पवई तूंगागाव येथील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी अशोक मातेकर यांनी घेतली अधिकाऱ्यांची भेट

प्रतिनिधी
■ मुंबई

पवई तुंगा व्हीलेज प्रभाग क्रमांक १५६ येथील स्थानिक नागरिकांना भेडसावणाऱ्या पाण्याच्या समस्या विषयी शिवसेना चांदिवली विधानसभा प्रमुख अशोक माटेकर यांनी मनपा जल विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी निवेदन देण्यात आले आहे.

पवई तुंगागाव येथील गोसावी चाळ, उस्मान चाळ, मैनुद्दीन चाळ, ताराबाई नगर, लक्ष्मी चाळ या परिसरात तसेच पवई क्लोरिनेशन या ठिकाणी गेल्या अनेक महिन्यांपासून अतिशय कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने स्थानिक नागरिकांना गैरसोय आणि नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन शिवसेना विधानसभा



प्रमुख अशोक माटेकर यांनी महानगरपालिका अधिकारी जल अभियंता मालवडे, उपप्रमुख जल अभियंता पाटील आणि कार्यकारी अभियंता भालेकर यांची भेट घेऊन सदर #समस्येबाबत #पत्र देऊन ह्या समस्यावर लवकरात लवकर योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. ही पाण्याची समस्या सोडविल्यास नागरिकांना पाण्या संबंधित त्रास होणार नाही.

पान 1 वरुन

### शहेनशाह मॉडेल...

मला एक गोष्ट आठवली. एके काळी मी तरुण होतो. मी आजीला विचारले की तू मेल्यावर लोक तुझी आठवण कशी ठेवतील? तिचे उत्तर होते की लोकांनी मला लक्षात ठेवू नये असे मला वाटते. मी लक्षात ठेवण्यासाठी काम करत नाही. राहुल म्हणाले, आठवणीत राहण्यासाठी काम करणे हे मोदीजींचे काम आहे.

पान 1 वरुन

### जातीचा उल्लेख...

असे सर्वोच्च न्यायालयाने यावेळी म्हटले आहे. यूट्यूब व्हिडीओमध्ये स्कारियांनी एससी किंवा एसटी समुदायाविरुद्ध शत्रुत्व किंवा द्वेष वाढवण्याचा प्रयत्न केल्याचे सिद्ध करणारे काहीही आम्हाला आढळले नाही. व्हिडिओचा एससी किंवा एसटी सदस्यांशी काहीही संबंध नाही. त्यांचे लक्ष्य फक्त तक्रारदार श्रीनिजन होते, असे न्यायालयाने म्हटले आहे.

पश्चिम रेल्वे
दुरुस्ती कामे
विभागिय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए). पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभि. विभाग, मुंबई सेन्ट्रल, मुंबई खालील कामांसाठी ई – निविदा मागवित आहेत:

| अनु. क्र. | निविदा सूचना क्र. आणि दिनांक | काम आणि ठिकाण | कामाचे अंदाजे मूल्य (रु.मध्ये) | इरठे (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | बीसीटी/२३-२४/१३८ दि. १३/०८/२०२४ | उकाई सोनगड – जळगाव अनुभाग: थरो स्लीपर रिन्युअल (पी) – १५.२२ किमी आणि (टीआरआर (पी) ३.०० टीकिमी आणि टिएसआर-(पी) २१.६४० टीकिमी | ९,१७,३६,५९१.०७ | ६,०८,७००.०० |
| २ | बीसीटी/२३-२४/१३९ दि. १३/०८/२०२४ | १५/ ए: उधना – जळगाव अनुभाग: सिंधखेडा (वगळता) ते जळगाव (वगळता) किमी २१२.४८२ ते किमी ३०१.४७० दरम्यान एसएसई (डब्ल्यू) एएन ह्यांच्या अधिकारक्षेत्रामध्ये साधारण दुरुस्ती आणि रंगकाम, व्हाईट वॉशिंग, कलर वॉशिंग, डिस्टेम्परिंग पोलिशिंग इत्यादी. | ९५,०२,४८५.४४ | १,९०,१००.०० |
| ३ | बीसीटी/२३-२४/१४० दि. १३/०८/२०२४ | नंदुरबार : संबंधित देखभाल सुविधांसह आर्ट/ एआरएमई सायडिंगची तरतूद. | ३,४६,२१,७०४.४१ | ३,२३,१००.०० |

उपरोक्त नमूद सर्व निविदांसाठी सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: १७/०९/२०२४ रोजी १५:०० वा. पर्यंत उघडण्याचा दिनांक आणि वेळ: १७/०९/२०२४ रोजी १५:०० वा पर्यंत उघडण्याचा दिनांक आणि वेळ: १७/०९/२०२४ रोजी १५:३० वा. अधिक तपशिलासाठी कृपया आमचे संकेतस्थळ www.ireps.gov.in ला भेट द्या. प्रत्यक्ष आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
विविध बांधकाम कामे
विभागिय मुख्य अभियंता (बांधकाम), पश्चिम रेल्वे ८ वा मजला, स्टेशन बिल्डिंग चर्चगेट, मुंबई-४०००२० मागवित आहेत. निविदा क्र.: उप. सीई(सी)/सीसीजी/३४५ दिनांक: १६/०८/२०२४ कामाचे नाव: गोरेगाव ते बोरिवली स्थानकांच्या दरम्यान हर्बरलाईन विस्तारा संदर्भात गोरेगाव ते मालाड दरम्यान बांधकाम, विस्तार आणि एफओबी,एलेव्हेटेड डेक, स्कायवॉक आणि अन्य बांधकामाचे पुनर्बांधकाम. निमासू शुल्क: रु. ८१,१७,७०,८३८.२४/- बोली सुरक्षा: रु. ४२,०८,९००.००/- बोली सुरू दिनांक: २८/०८/२०२४. बोली सादरीकरण:- ११/०९/२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यंत. निविदा कागदपत्रे उघडणे : ११/०९/२०२४ रोजी १५.३० वाजता. अधिक माहितीसाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. ०४६९
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
साहित्य व्यवस्थापन विभाग
ई-प्रापन निविदा सूचना क्र. एस/४६/२०२४ दिनांक २२.०८.२०२४

| अनु.क्र. | संक्षिप्त वर्णन | परिमाण | देय दिनांक |
|---|---|---|---|
| ५८५ | आरटीव्ही सिलिकॉन रब्बर | ६७६७ नग | १८-सप्टें-२४ |
| ५८६ | एम.एस. शीट ३.१५ मिमी थिक. x १२५० x ४५०० | ४५००० केजी | १८-सप्टें-२४ |
| ५८७ | इंट्राअ‍ॅरोटिक बलून पंप | २ नग | १८-सप्टें-२४ |
| ५८८ | जोडलेल्या स्पष्टीकरणानुसार हायड्रॉलिक मोबाईल क्रेन लिफ्टिंग कॅपेसिटी १६ टन | १ नग | १९-सप्टें-२४ |
| ५८९ | स्पाईन इंडोस्कोपी सिस्टिम | २ नग | २०-सप्टें-२४ |
| ५९० | हाय अंड अल्ट्रासोनोग्राभी युनिट | २ नग | २०-सप्टें-२४ |
| ५९१ | ४.५ केडब्ल्यू करीता टेंन्शनिंग डिवाईस अ‍ॅसेम्बले | ६६६ संच | २४-सप्टें-२४ |
| ५९२ | थ्रेड एम१६ नॉमिनल लेंथ ५०मिमी आणि प्रॉपर्टी क्लास ४.८ सह एम.एस, ब्लॅक हेक्सागॉन हेड बोल्ट | ३८६७५ केजी | ३०-सप्टें-२४ |

इरठे, खरेदी बंधने आणि तपशिलवार निविदा अटी असलेल्या तपशिलवार सूचनेच्या संदर्भात कृपया www.ireps.gov.in आणि www.wr.indianrailways.gov.in ला भेट द्या. ०४७८
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
विद्युत काम
वरी. डीईई/पी/बीसीटी, ई-निविदा सूचना क्र.: ईएल ८१/२/६५३/डब्ल्यूए/३२ दि. २३.०८.२०२४ मागवित आहेत. काम आणि ठिकाण: बधवार पार्क रेल्वे कॉलनी येथील ऑफिसर्स क्लबच्या दुरुस्ती आणि नुतनीकरण संदर्भात कुलाबा बधवर पार्क इलेक्ट्रीकल (पॉवर) काम. कामाचे अंदाजे मूल्य: रु. १,३३,५८,७३२.००/- इरठे: रु. २,१६,८००/-. सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: २३/०९/२०२४ रोजी १५:०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: २३/०९/२०२४ रोजी १५:३० वा. अधिक माहितीसाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. ०४८५
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
दुरुस्ती आणि पेंटिंग काम
विभागिय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभि. विभाग, मुंबई सेन्ट्रल, मुंबई – ४००००८ ई-निविदा सूचना क्र.: बीसीटी/२४-२५/१४८ दि. २२.०८.२०२४ मागवित आहेत. काम आणि ठिकाण: दादर स्काय स्क्रॅपर बिल्डींगच्या प्लास्टरची दुरुस्ती आणि बाह्य आणि अंतर्गत रंगकाम. कामाचे अंदाजे मूल्य: रु. १,४१,२९,७३०.१७/- इरठे: रु. २,२०,७००/- सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: १७/०९/२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत उघडण्याचा दिनांक आणि वेळ: १७/०९/२०२४ रोजी १५.३० वा. अधिक माहितीसाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. प्रत्यक्ष आलेले प्रस्ताव विचारत घेतले जाणार नाहीत. ०४८२
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
इलेक्ट्रिकल पॉवर वर्क
वरी. डीईई/पी/बीसीटी निविदा सूचना क्र.: ईएल८१/७/९१९/डब्ल्यूए/२२ दिनांकीत: १९/०८/२०२४ मागवित आहेत. काम आणि ठिकाण: बोंबार्सी येथे अंतर्गत'आणि बाह्य नूतणीकरणासह हेरिटेज टाईप रूफ, ट्रस संदर्भात ईलेक्ट्रिकल पॉवर वर्क. कामाचे अंदाजे मूल्य: रु. १५,००,०००/- बोली सुरक्षा ठेव ईरठे: रु. ३०,०००/- सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: १९/०९/२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: १९/०९/२०२४ रोजी १५.३० वाजता. टीप: निविदा कागदपत्रे, शुद्धीपत्रक आणि अधिक माहिती डाऊनलोड करण्यासाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट दया. ०४७४
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
पे आणि पार्क
विभागिय रेल्वे व्यवस्थापक, वाणिज्य विभाग, पार्किंग सेक्शन, मुंबई सेन्ट्रल – मुंबई ४०० ००८.
**काम- मुंबई विभागामध्ये "सर्व वाहनांचे पे अँड पार्क" प्रचालन**

| | |
|---|---|
| लिलाव महितीपुस्तिका क्र.-एमएमसीटीपीकेजी-२४२५-११ | कंत्राट कालावधी: ०३ वर्ष |
| ई-लिलाव दिनांक: ०४/०९/२०२४ | ई-लिलावाची वेळ: १५.०० वाजता |

| अनु. क्र. | स्थानक | ठिकाण | क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|
| १ | नवसारी | पूर्व | २७० |
| २ | मढी | नवीन ईमारतीजवळ | ७५७.८७ |
| ३ | मरोळ | पश्चिम | ६०० |
| ४ | उंबरगाव रोड | पश्चिम | ६१४.२८ |
| ५ | माहीम | पूर्व | २३२ |
| ६ | प्रभादेवी | पश्चिम | ३०९.२९ |
| ७ | जोगेश्वरी एटी | नवीन सिमेंट यार्ड जवळ | ११७१.२५ |
| ८ | वसई | पश्चिम | १३६ |
| ९ | कांदिवली | पश्चिम | १४३६.१७ |
| १० | बोरिवली | पूर्व | १२३५.३४ |


टिप: प्रस्तावित बोलीदाराना विनंती करण्यात येत आहे की आयआरईपीएस संकेतस्थळ (www.ireps.gov.in) ला भेट द्या. लॉटनुसार तपशिल नमूद माहिती पुस्तिकेमध्ये नमूद करण्यात आली आहे. ०४७०
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
दुरुस्ती कामे
विभागिय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभि.डेपो, मुंबई सेन्ट्रल, मुंबई – ४००००८ ई-निविदा मागवित आहेत

| अनु. क्र. | निविदा सूचना क्र. आणि दिनांक | काम आणि ठिकाण | कामाचे अंदाजे मूल्य (रु.मध्ये) | इरठे (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | बीसीटी/२४-२५/१४५ दि. २०/०८/२०२४ | खार-जोगेश्वरी : खार रोड, सांताक्रूझ, अंधेरी आणि जोगेश्वरी येथील रेल्वे कॉलनी मध्ये तुटलेले रूफ शेड, वेदर शेडची दुरुस्ती आणि आरसीसी रूफ स्लॅबचे वॉटर प्रुफिंग. | १,३७,०८,०४६.१३ | रु. २,१८,६००.०० |
| २ | बीसीटी/२४-२५/१४६ दि. २०/०८/२०२४ | **भाईंदर (बीव्हायआर) आणि मीरारोड (मीरा)**:चर्चगेट-विरार अनुभाग- टीआरआर(पी)-८.०४१ किम आणि टीएसआर(पी) ४४.०६३ किमी संदर्भात फलाट क्र. ६ आणि फलाट क्र. ४ च्या फलाटाची उंची वाढविणे आणि टॅक्टटाईल टाईल. | १,४५,८५,५७०.०३ | रु.२,२२,९००.०० |
| ३ | बीसीटी/२४-२५/१४७ दि. २०/०८/२०२४ | **महालक्ष्मी (ईएमयू कार्यशाळा) :** ईएमयू कार्यशाळा महालक्ष्मीच्या विविध सेक्शनमध्ये पेटी दुरुस्ती आणि उपहारगृहाची दुरुस्ती. | १,७९,०८,८२०.८३ | रु. २,३९,६००.०० |

उपरोक्त सर्व निविदांसाठी, सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: १७/०९/२०२४ रोजी १५:०० वाजता., उघडण्याचा दिनांक आणि वेळ: १७/०९/२०२४ रोजी १५:३० वाजता. अधिक माहितीसाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. प्रत्यक्ष आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. 0471
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

मी जिंकण्यासाठी बांधील नाही. पण मी चांगलं आणि वाईट होण्यासाठी बांधील आहे.



- अब्राहम लिंकन
माजी राष्ट्राध्यक्ष, अमेरिका

वृत्तमानस
मुंबई, रविवार, २५ ऑगस्ट २०२४

२५-०८-२०२४ ते ०१-०९-२०२४ (रविवार ते शनिवार)




**मेष - समाधानी वृत्ती राहु शकेल.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना लाभात वाढ होऊ शकेल.या दिवसांत जे काही बदल होणार आहे ते अनपेक्षित बरे असु शकतील.त्यामुळे बदल स्वीकारून पुढे जा.म्हणजे नुकसान होणार नाही.इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन समंसपनाचा असु शकेल.असे हे सर्व दिवस असेचआहेत. हा तात्पुरत्या वलयाचा असु शकेल.हे तुम्हाला माहीत झालेले आहे.तरीसुद्धा गैरसमज करून घेणे बरे नसेल.२६चा मिथुनेतुन होनारा मंगळबदल पोषक राहील.व्यवसायात प्रगती होऊ शकेल.नोकरदार वर्गाला कामामध्ये समाधानी वृत्ती राहु शकेल.मनमानी टाळलेली बरी.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या व्यवहार जपून करावेत.घरगुती वातावरण चांगले राहील.मित्र-मैत्रिणींशी मात्र जेवढ्यास तेवढे राहाने पोषक असेल.दुरावा येणार नाही.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्या
**शुभदिनांक २५-२६-२७.**

**वृषभ-भाग्योदय होऊ शकेल.**
ग्रहबळ पहाता संपूरण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियजितकामे करतांना भरभरुन यश मिळेल. या सर्व दिवसांचा कालावधी उत्तम राहु शकेल.हे दिवस तुमच्यासाठी प्रसिद्धीचे आहेत.असे समजायला हरकत नाही.आतापर्यंत तुम्ही ज्या गोष्टींसाठी प्रयत्न करत होता तो प्रयत्न यशस्वी होतनव्हता.विलंब लागत होता.सध्या तो लागणार नाही.सहज मार्गी कामे होत राहतील.कौटुंबिकस्तरावर वावरतांना आनंदात चांगली वाढ होऊ श केल.मंगळबदल सर्वस्तरावर चांगले लाभ वाढवु शकेल. सुरु असलेल्या व्यवसायात भरभराट होऊ शकेल. नोकरदार वर्गाला नवीन कामाची जबाबदारी मिळेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत समाधानी राहाल.राजकीय क्षेत्रात ऊत्तमयश मिळेल.मित्रमैत्रिणींचे नाते अतूट होईल.धार्मिक कार्यासाठी खर्च कराल.सहकार्य मिळेल.
**विद्यार्थी -** आरोग्य ठणठणीत राहील.
**शुभदिनांक-२६-२७-२८.**

**मिथुन-जरा धीर धरणे बरे राहील.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजितकामे करतांना सकारात्मक स्थिती असु शकेल. या सर्व दिवसांत स्वत:ला झेपेल अशाच गोष्टी कराव्या लागतील.ज्या गोष्टी तुम्हाला जमणार नाहीत अशा गोष्टींची जबाबदारी घेऊच नका.अन्यथा नुकसान होऊ शकते. त्यामुळे कदाचित तुमची चिडचिड होऊन इतरांबरोबर वाद-विवादही होऊ शकतात.प्रत्येक गोष्टीत आपलेच खरे करणे सध्यातरी योग्य राहणार नाही.सध्या इतरांचे मत ऐकून घ्यावेच लागणार. मंगळबदल रागातवाढ करु शकेल. व्यवसायात मागील काही दिवसांपेक्षा सध्याचे दिवस चांगले आहेत.नोकरदार वर्गाला संवादाची गरज भासेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत बचत करणे योग्य राहु शकेल. समाजसेवेची आवड राहील.कुटुंबाची जबाबदारी पार पाडावी लागेल. आध्यात्मिक गोष्टीत मन रमवावे लागेल.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे असेल.
**शुभदिनांक -२९-३०-३१.**

**कर्क-विश्रांतीची गरज असेल.**
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना दगदग करुन चालनार नाही.ज्यावेळी सप्ताहात असे भ्रमण असते. त्यावेळी एक गोष्ट लक्षात ठेवावे लागते.ते असे आपण सावधानतेने पाऊल टाकणे गरजेचे राहील.तुमची बाजू सत्य असली तरी ती समोरच्याला पटणार नाही.तेव्हा कोणाला सांगायला किंवा सल्ला द्यायला जाऊ नका."आपले काम भले नि आपण भले" कोणतेही महत्त्वाचे निर्णय सध्या तरी घेऊ नका. सर्व दिवस जपून पाऊल टाका.मंगळबदल खर्चीक राहील. व्यवसायात जे चालले आहे. ते योग्य असे समजून पुढे चला. नोकरदार वर्गाने कामात वेळिच लक्ष द्यावे लागेल.
**महिला -** आर्थिक बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न वेळिच करावा लागेल.जोडीदाराच्या सल्ल्याने सर्व निर्णय घ्यावेलागतील. मानसिकदृष्ट्या शांतता राखावी लागेल.
**विद्यार्थी -** प्रकृतीची काळजी घ्यावी.
**शुभदिनांक-३०-३१-१.**

**सिंह - मध्यस्थी करु नका.**
ग्रहसंकेत पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना विचार करुन करत चला.कारण या दिवसांत जे काही निर्णय घेणार त्या निर्णयांना तित केसे यश मिळणार नाही.असे असतानासुद्धा तुम्ही निर्णय घेतले तर ते कदाचित चुकीचे ठरू शकतात.तेव्हा थोडेसे शांत राहून विचार करून मगच निर्णय घ्यावेत.ज्यावेळी दिवस चांगले असतात त्या दिवसांत निर्णय घेणे म्हणजे यशाच्या पायरीपर्यंत पोहोचण्यासारखे असते.कोणतीही घाई करू नका.मंगळबदल लाभास बरा राहील.व्यवसायात नवीन गुंतवणूक अविचाराने करू नका. नोकरदार वर्गाने कामाव्यतिरिक्त इतर गोष्टीत लक्ष घालू नका.
**महिला -** आर्थिक नियोजन पक्के करावे लागेल.कुटुंबाशी जुने असलेले वादविवाद टाळावे लागतील.समाजसेवा करतांना विनाकारण चिडचिड करु नका.
**विद्यार्थी -** प्रकृतीत निष्काळजीपणा टाळा.
**शुभदिनांक-२५-२६-२७.**

**कन्या-उत्तम आठवडा जाईल.**
ग्रहसंकेतपहाता संपूर्ण सप्ताह लाभदाक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना संवाद साधत चला.चांगले यशमिळवु शकाल.या सर्व दिवसांत कोणतीही देवाण-घेवाण करताना व्यावहारिकपणे करणे अधिक पोषक राहील.भावनिकपणे कोणतेही केलेले व्यवहार कदाचित नुकसानीचे ठरू शकतात.इतरांच्या सांगण्या बोलण्यावर लक्ष देऊ नका.उगाच चांगली वेळ वाया जाऊ शकेल.जेडोळ्यांनी प्रत्यक्षात दिसते त्यावर विश्वास ठेवा.दिवस चांगले असतील.होणारा मंगळबदल लाभात उत्तम वाढ करु शकेल.व्यवसायात फायद्याचे प्रमाण उत्तम राहु शकेल.नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे सदैव सहकार्य मिळु शकेल.
**महिला -** समाधानकारक लाभ होऊ शकतील.वायफळ खर्च कमी करावे लागतील.समाजसेवेतून आनंद मिळेल. मैत्रीचे नाते दृढ होईल. घरगुती वातावरण चांगले राहील.
**विद्यार्थी -** साधनेला महत्त्व द्या.
**शुभदिनांक-२६-२७-२८.**

**तूळ-परिपक्वता वाढेल.**
ग्रहसंकेतपहाता उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना सफलता मिळवु शकाल.या सर्व दिवसांचा कालावधी अधिक चांगला कसा जाईल ते पाहिलेले बरे राहील.कारण या दिवसांत कदाचित नको त्या गोष्टी मागे लागू शकतात.अशावेळी घाईगडबडीने कोणतीही गोष्ट करणे कदाचित त्रासाचे राहील.या दिवसांत कोणत्याही अफवांना बळी जाऊ नका.अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.स्वत:चे व्यवहार इतरांच्या हातात देऊ नका.स्वत:च निर्णय घ्यावे लागतील.मंगळबदल बरा राहु शकेल. व्यवसायात परिळ्रमाने चांगली परिपक्वता येऊ शकेल. नोकरदार कामात जबाबदारी पडत होती ती कमी होईल.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या चांगली सफलता मिळु शकेल.राजकीय क्षेत्रात वरिष्ठांचे सहकार्य मिळु शकेल.घरगुती कार्यक्रमाचे नियोजन यशस्वी होऊ शकेल.धावपळ होईल.
**विद्यार्थी -** आरोग्य काळजी घ्या.
**शुभदिनांक-२९-३०-३१.**

**वृश्चिक-स्वतहावर नियंत्रण ठेवा.**
ग्रहसंकेतपहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना संयम वाढवावा लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना उगाचच पोकळ आठवणी जागवतील.त्यातुन वेळिच बाहेर पडने बरे राहील.संवाद वाढवावे लागतील. सप्ताहात सर्वच दिवस प्रतिकूल आहेत."हमकरे सो कायदा"याचा धोका वेळिचओळखने बरे राहील.असेच म्हणायला हरकत नाही.कारण असा कोणताच दिवस नाही की त्यात मनस्ताप संताप चिडचिड होनार नाही.मंगळबदल वाद टाळन्यास सुचवतो. नियोजित उपासना सोडु नका. व्यावसायिकदृष्ट्या गुंतवणूक विचारपूर्वक वाढवावी. नोकरदार वर्ग कामात पूर्णपणे व्यस्त राहावे लागेल.
**महिला -** आर्थिक ताणतणाव कमी होईल असे दिसत नाही.हाती घेतलेले आहे त्या कामाला विलंब होईल. जे आहे त्यातच समाधान मानत मानने बरे.राग नको.
**विद्यार्थी -** मित्र दूर होतील.
**शुभदिनांक-३०-३१-१.**

**धनू-परंपरा जपु शकाल.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना प्रतिसाद मिळु शकेल.सध्या या आठवड्यात असा कोणताच दिवस नाही की जो विशेष काळजी वाढवणारा आहे. मग अशी परिस्थिती असेल त्यावेळी मात्र तुम्ही शांतपणे दिवस पुढे ढकलता.महत्त्वाचे कोणतेही काम करत नाही.तेव्हा सध्या दिवस बर्यापैकी बरे आहेत हे विसरू नका.नियोजित कामाला कदाचित गती येईल.तयारी करून कामाला लागावे लागेल.इतरांची मदतही मिळेल. मंगळबदल नियंत्रण सुचवतो. व्यवसायात फायद्याचे प्रमाण बर्यापैकी बरे राहु शकेल.नोकरदार वर्ग कामात संदर्भात वरिष्ठांशी चर्चा करावी. महिला-आर्थिक लाभ बरे होऊ शकल.समाजसेवा करण्याची आवड नसली तरी तुम्हाला ती करावी लागेल. धार्मिक कार्यात सहभाग नसला तरी सहकार्य कराल.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे राहील.
**शुभदिनांक-२५-२६-२७.**

**मकर - उत्तम आघाडी मिळवाल.**
ग्रहप्रभावपहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना उत्तम यश मिळवु शकाल.सर्व दिवसांचा कालावधी अत्यंत चांगला राहु शकेल.सध्या तुम्ही जे ध्येय ठरवलेले आहे ते ध्येय सहज पूर्ण होणारे आहे.त्यासाठी कोणाची मदत घ्यावी लागणार नाही.स्वत:चे काम स्वत:कराल.तुम्ही घेतलेले निर्णय योग्य असु शकतील.धावपळीचा मार्ग कमी होऊ शकेल.उत्साह वाढेल. अनपेक्षित असे प्रस्ताव तुमच्यापुढे येतील.ते तुमच्यासाठी खूप चांगले असतील.मंगळबदल लाभवाढवील. व्यावसायिकदृष्ट्या उत्तमआघाडी मिळवु शकाल.नोकरदार वरिष्ठांचे मत घेऊनच नियमावली तयार करावी. **महिला -** आर्थिकआवक वाढेल.सध्या सार्वजनिक ठिकाणी वेळ देणे शक्य होणार नाही.जोडीदाराचे सहकार्य उत्तम मिळु शकेल.आध्यात्मिक गोष्टींची आवड राहील.
**विद्यार्थी -** प्रकृतीत चांगली सुधारणा.
**शुभदिनांक-२६-२७-२८.**

**कुंभ-नियंत्रण ठेवत चला.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊशकेल.नियोजित कामे करतांना यश मिळवु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांनाहे दिवस एक घाव दोन तुकडे असे करून चालणार नाही.त्यामुळे कदाचित नुकसान होऊ शकते.त्यापेक्षा शांततेच्या मार्गाने गोष्टी चांगल्या होतील. स्वत:वर नियंत्रण ठेवने अधिक पोषक राहु शकेल. वाद विवाद या गोष्टींपासून लांब राहा.आपले मत इतरांवर लादण्याचा प्रयत्न करू नका.समोरच्याला काही गोष्टी नाही पटल्या तर सोडूनद्या. मंगळबदल वाद नको.व्यवसायात भागीदारी व्यवसाय करताना व्यवहाराला महत्त्व द्यावे.नोकरदार वर्गाला सामूहिकरीत्या काम करावे.
**महिला -** वेळेचे महत्व वेळिच ओळखुन वेळेवर कामे करा.लाभ होतील.आर्थिक बाबतीत बचत करावी लागेल कुटुंबात स्वस्थ राहा. आहाराचे पथ्य पाणी सांभाळा.
**विद्यार्थी -** यश मिळवाल.
**शुभदिनांक-२९-३०-३१.**

**मीन-आळस बाजूला करावा.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना उगाचच चिडचिड करुन नुकसानओढवुन घेऊ नये. या दिवसांत आळस बाजूला सारून काम करावे लागेल. कौटुंबिकस्तरावर वावरतांना जबाबदारिने बोलने बरे राहील. समाजात कामे करतांना कोणावर अवलंबून राहून काम करायचे ठरवल्यास ते होणार नाही.तेव्हा कोणाची अपेक्षा ठेवू नका. कोनत्याही गोष्टीचा शुभारंभ या दोन दिवसात करूनका.येणारे प्रस्ताव स्वीकारू नका.नियमबाह्य गोष्टी टाळाव्यात.मंगळबदल ठीक राहील. व्यावसायिकदृष्ट्या पावले जपुन टाकावे लागतील.नोकरदार वर्गाला सध्या आहे त्यात समाधान मानावे लागेल.
**महिला -** वायफळ खर्चाची बाजू कमी करावी लागेल ते सांभाळा. मित्र-मैत्रिणींशी उगाचच सलोखा वाढवु नका. घरगुती वातावरण साधारण बरेराहील.शांत रहाणे बरे.
**विद्यार्थी -** उगाचच चिडचिड नको.
**शुभदिनांक-३०-३१-१.**

# गोपाळकाल्यामागील व्यापक दृष्टिकोन आणि उत्सवाचे बदलते स्वरूप...

गोपाळकाला अगदी तोंडावर आल्याने लाखांची बक्षिसे लावण्यात आलेल्या हंड्यांचे फ्लेक्स ठिकठिकाणी पाहायला मिळू लागले आहेत. श्रीकृष्णाने व्रजमंडळात गायी चारतांना स्वतःची आणि सवंगड्यांच्या शिदोऱ्या एकत्र करून खाद्यपदार्थांचा काला केला आणि सर्वांसह ग्रहण केला. या कथेला अनुसरून पुढे श्रीकृष्ण जयंतीच्या दुसऱ्या दिवशी काला करण्याची आणि दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली. कालपरत्वे या प्रथेचे व्यावसायिकरण झाले आणि ठिकठिकाणी लाखांची बक्षिसे मिळवून देणाऱ्या हंड्या बांधल्या जाऊ लागल्या.

आता नवरात्रीप्रमाणे दहिहंडी उत्सवही राजकारणी आणि धनदांडग्यांची मक्तेदारी झाली आहे. राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या हंड्या इच्छुक उमेदवारांसाठी प्रचाराचे मोठे साधन ठरणार आहेत. त्यामुळे दहीहंडी पथकाकांडून यंदा भरघोस कमाई केली जाणार हे निश्चित आहे. दहीहंडीच्या व्यासपीठावरून राजकीय फटाके फुटण्याची शक्यताही यंदा नाकारता येत नाही. जो अधिक रकमेची बक्षिसे लावेल त्याच्या दहीहंडीला मोठ्या प्रमाणात गर्दी तर दिसतेच शिवाय वृत्तवाहिन्या, लोकल केबल नेटवर्कवाले अशा ठिकाणी पहाटेपासून दबा धरून बसलेली पाहायला मिळतात. लोकांनी अधिक गर्दी करावी यासाठी याठिकाणी सेलिब्रिटीजनाही अतिथी म्हणून बोलावले जाते. त्यांच्याकडून नृत्य करवून घेतले जाते, चित्रपटातील संवाद म्हणण्यास सांगितले जाते. काही तरुण मंडळी तर खास या सेलिब्रिटी मंडळींना पाहण्यासाठी गर्दी करतात. गोविंदा पथक येतात, मनोरे रचतात, मोठे साहस करून अगदी वरच्या थराला पोहोचलेली किशोरवयीन मुले जमलेल्या जमावाला अभिवादन करतात; मात्र खास सेलिब्रिटींना पाहण्यासाठी आलेल्या मंडळींचे या गोविंदा पथकांकडे लक्षही नसते. वृत्तवाहिन्या, केबल नेटवर्क यांचे कॅमेरेसुद्धा केवळ सेलिब्रिटींभोवतीच घुटमळत असतात. दहिहंडीला साहसी खेळाचा दर्जा देण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या पुढाकारातून मागील वर्षांपासून मुंबईत प्रो कबड्डीच्या धरतीवर प्रो दहीहंडीचे आयोजन केले जात आहे. अर्थात याठिकाणी दहीहंडीच नसल्याने दहीहंडीच्या नावावर ती मानवी मनोऱ्यांची स्पर्धाच असले असेच म्हणावे लागेल. दहीहंडी उत्सवाच्या दिवशीही पुन्हा हेच चित्र पाहायला मिळते.

ज्या ठिकाणी दहीहंडीचा इव्हेन्ट बनवला जातो त्या ठिकाणी दहीहंडी केवळ नावाला उभी केलेली असते. अधिकाधिक थर लावा आणि तेव्हढ्या थरांसाठी नियोजित केलेली रक्कम घेऊन जा हा एकच कार्यक्रम याठिकाणी राबवला जातो. त्यामुळे याला उत्सव म्हणावे कि साहसी खेळाची प्रात्यक्षिके हाही एक प्रश्नच आहे. राज्यसरकारने गोविंदा पथकांना १० लाखांचे विमाकवच देऊन या मनोऱ्याच्या स्पर्धेला जणू प्रोत्साहनच दिले आहे. आज सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढे जात आहेत त्यामुळे दहीहंडीही यातून सुटलेली नाही. मुंबईत महिला गोविंदा पथकांची संख्याही वर्षागणिक वाढू लागली आहे. ज्या ठिकाणी महिला गोविंदा पथक हंडी फोडण्यास येतात अशा ठिकाणी बघ्यांची गर्दी जरा जास्तच झालेली पाहायला मिळते. यामध्ये आंबट शौकीनही असतात. श्रीकृष्णाने बालगोपाळांसह हंड्या फोडून लोणी खाल्ल्याचे सर्वांनाच ज्ञात आहे; मात्र गोपिकांनी त्याकाळी असे काही केलेले नाही, त्यामुळे दहीहंडी उत्सवाकडे धार्मिक उत्सव म्हणून पाहायचे असेल, तर किमान महिलांच्या हंडीची तरी या उत्सवामध्ये गणना करू नका.

श्रीकृष्णाचे सवंगडी विविध वर्णातील तर होतेच शिवाय त्यातील अनेक जण खूपच गरीब होते. आपल्या सवंगड्यासह आपलीही शिदोरी एकत्र करून सारे भेद नष्ट करून एकत्र येण्याचा मोलाचा संदेश श्रीकृष्णाने गोपाळकाल्याच्या माध्यमातून दिला आहे. आज हिंदू धर्मामध्ये जातीपातीच्या नावाखाली, राजकीय पक्षभेदामुळे आणि वैचारिक भेदांमुळे विविध गट निर्माण झाले आहेत. आज जाहिराती, सिनेमा, वेब सीरिजच्या माध्यमांतून केले जाणारे देव-देवतांचे, महापुरुषांचे, इतिहासाचे विकृतीकरण याचे आपल्याला काहीच वाटत नाही. कोणीही उठते आणि हिंदूंच्या धार्मिक प्रथा परंपरांना अंधश्रद्धा म्हणून हिणवते. पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे आपणच आपल्या महान संस्कृतीला विसरून परकीय संस्कृतीला जवळ करू लागलो आहोत. परिणामी आपलीच अपरिमित हानी होत आहे. भगवान श्रीकृष्णाच्या शिकवणीनुसार यंदा आपापसातील सारे मतभेद विसरून राष्ट्राच्या आणि धर्माच्या पुनरुत्थानासाठी एकत्र येण्याचा संकल्प करूया आणि खऱ्या अर्थाने गोपाळकाला साजरा करूया !

- जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

## पत्र मानस

### खड्ड्यांच्या समस्यांमुळे प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना पसंती.!

प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींवर बंदी आहे परंतु स्थानिक प्रशासनाने बंदीची अमंलबजावणी लागू केलेली नाही. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तीं बनविण्याचा मुंबई, कोकणातील अनेक कुटुंबियांनी पिढ्यानपिढ्या व्यवसाय म्हणून स्विकारला असून त्यावर होणाऱ्या कमाईवर त्यांचा उदरनिर्वाह होत असतो. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्त्या वजनाने हलक्या, मजबूत, ने आण करण्यास सोप्या पडतात आणि त्यांच्या किंमती माफक असल्याने शाडूच्या मूर्तींपेक्षा अधिक प्रमाणात पसंत केल्या जातात. शाडूच्या मूर्तीं १५ टक्के शाडूची माती ५ टक्के कागदी लगदा वापरून बनविल्या जातात त्या वजनाने जड असतात. त्यामुळे त्यांची आगमन व विसर्जनाच्या वेळी फार काळजीपूर्वक ने आण करावी लागते. शहरांबाहेरून मूर्त्यांची हाताळणी करण्यासाठी प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्त्या ने आण करतांना भंग पावण्याच्या शक्यता फारच कमी असल्याने त्यांची हाताळणी सूकर होते असा मूर्तिकारांचा व ग्राहकांचा कल असतो. सध्याच्या शहरांतील किंवा गावांतील रस्त्यांच्या खड्डेमय अवस्था लक्षात घेता गणेशोत्सव काळात घरोघरी प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती आणून त्यांचे पूजन केले जाते. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्त्या पाण्यात विरघळण्याठी फार विलंब होत असल्याने समुद्र, तलाव, नद्या येथील जैवविविधतेवर दुष्परिणाम होत असतात. याच कारणांनी शाडूंच्या मूर्त्यांना प्रथम पसंती दिली जाणे आवश्यक आहे. त्यासाठीच सरकारांनी प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी लागू केली आहे. कित्येक कुटुंबिय शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून त्या बंदीचा मान राखतात. त्याचवेळी वर्षानुवर्षे प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनविणाऱ्या मूर्तिकार व त्यांचे कारागीर यांच्यासमोर रोजगाराचे प्रश्न उपस्थित होऊन त्यांना व त्यांच्या कुटुंबियांच्या उदरनिर्वाहाचे अन्य साधन उपलब्ध होणे कठीण होऊन बसेल. त्यामुळेच गणेशोत्सवात मूर्त्यांची निर्मिति, पूजन व विसर्जन याबाबतीतची परिस्थिती आणखी काही काळ तरी "जैसे थे " अशीच राहणार आहे. "

**- स्नेहा राज, गोरेगांव**

### राजीनामा देतील का?

बदलापुरातील एका शाळेत दोन चिमुकल्या मुलींवर घडलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर आंदोलनात जनक्षोभ उसळला होता.राज्यात आंदोलन होत आहेत.रोज बलात्कार व अत्याचाराच्या बातम्या येत आहेत.पूर्वीचे नेते घडलेल्या धक्कादायक आणि निंदनीय घटनेची जबाबदारी स्विकारत मंत्रीपदाचा राजीनामा देत असत. त्यांना सत्तेची हव नव्हती व नितीमत्ता होती.आताच्या नेत्यांना हाती असलेली सत्ता सोडायची नसल्याने किती मोठ्या घटना घडल्यातरीही आम्ही मंत्रीपदाचा राजीनामा देणार नाही,अशी शपथ तर घेतली नाही ना? राज्याच्या आताच्या मंत्रीमंडळातील आपल्या गृहमंत्र्यांनी सात वर्ष गृहमंत्रीपद सांभाळत आहेत. तरीही राज्यातील महिलांना अत्याचराला सामोरे जावे लागत आहेत.महिला व मुली गायब होत आहेत.गृहमंत्रालयाचा गुन्हेगारांवर वचक राहिलेला नसल्याने गुन्हे वाढत आहेत.राज्यातील महिला सुरक्षेचा प्रश्न आणि कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्नावरून विरोधक मंत्रीपदाचा राजीनामा मागत असताना सत्ताधारी मंत्री मानवतेला न शोभणारे बेजबाबदार कृत्य पाहत असतानाही राजीनामा देत नाहीत. विधानसभा निवडणुका जवळ असल्याने राजीनामा देऊन जनतेसमोर नितीमत्ता दाखवण्याची संधी दवडली जात आहे. दुस-या राज्यात घडलेल्या घटनेचा संबंध न लावता मंत्र्यानी मंत्रीपदाचा राजीनामा द्यायला पाहिजे.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

### गरीब श्रीमंत यातील दरी मोठ्या प्रमाणात .. जागतिक निष्कर्ष

मागील पाच वर्षाचा काळ लक्षात घेतला तर असे लक्षात येते कि जगातील श्रीमंत अति श्रीमंत झाले आहेत व गरीब अति गरीब होत चालले आहेत . कोरोना संकट, त्यानंतर जगभर उसळलेली बेकारी, अनेक कंपन्यांवर आलेले संकट अशा अनेक कारणामुळे अर्थव्यवस्था मोडकळीस आली . त्याचा मोठा फटका गरिबांना बसला .त्यांची परिस्थिती आणखी गरिबीची झाली . जगातील पाच श्रीमंत व्यक्तीच्या संपत्तीत गेल्या चार वर्षात सुमारे १४४ टक्के एवढी प्रचंड वाढ झाली आहे . त्यांच्या जवळ एवढी संपत्ती आहे कि त्यांनी जरी दररोज पाच कोटी रुपये खर्च केले तरीही त्यांचे पेसे संपायला तब्बल पाचशे वषे लागतील . अमेरिकेतील ऑक्सफॅम इंटरनॅशनल या संस्थेने दिलेल्या अहवालानुसार श्रीमंतांच्या संपत्तीत प्रचंड वाढ झाली आहे .जगातील पाच उधोगपतीची संम्पत्ती गेल्या चार वर्षात ४०५ अमेरिकन डॉलर्स वरून ८६९ अमेरिकन डॉलर्स एवढी झाली आहे . एका आकडेवारीनुसार हे उधोगपती प्रत्येक तासाला ११४ कोटी रुपयांहून अधिक ची कमाई करतायेत . असाच संपत्तीचा वेगा वाढत राहिल्यास पुढील दहा वर्षात जगात अनेक खरब पती तयार होतील . जगातील सर्वात एका टक्का असलेल्या श्रीमंत लोकांकडे तब्बल ४३ टक्के संपत्ती आहे . टेस्ला कंपनीचे मालक एलन मस्क हे सर्वात श्रीमंत आहेत .त्यांची संपत्ती २३० अरब एवढी आहे . तर गरिबीचा विचार केल्यास जगातील पाच अरब लोक गरिबीत आपले जीवन कंठतायेत . ऑक्सफॅम अहवालानुसार खाजगीकरणामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे .एकूणच जगातील गरीब गरीब होत चालले आहेत तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालले आहेत .संपत्तीचे विषम वाटप यामुळे ही दरी मोठी होत आहे याला वेळीच काही प्रमाणात जर आळा बसला नाही तर जगात मोठी गंभीर समश्या निर्माण होऊ शकते दिवसे दिवस जगातील लोकसंख्या वाढतच चालली आहे . त्यामानाने जमीन वाढत नाही . साहजिकच माणसाच्या अन्न वस्त्र व निवारा या गरजा पूर्ण होणे दुरापास्त आहे त्याच बरोबर पर्यावरणाचे मोठे संकट उभे राहिले आहे .मानवाला पुढील काळात स्वच्छ हवा व पाणी सुद्धा मिळणे कठीण होणार आहे . याचाच अर्थ पुढील काळ हा गरिबांची परीक्षा घेणारा असेल असे म्हटले तर वावगे ठरणार नाही

**- शांताराम वाघ पुणे**

**डोंबिवली :** काल २४ ऑगस्ट २०२४ रोजी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार डोंबिवली इंदिरा चौक इथे जिल्हा प्रमुख सदानंद थरवळ , महिला जिल्हा संघटक वैशालीताई राणे, उपजिल्हा प्रमुख तात्या माने, डोंबिवली विधानसभा संपर्क प्रमुख प्रकाश वाणी ,यांच्या नेतृत्वाखाली मूक आंदोलन करण्यात आले. सदर आंदोलनामध्ये शहर प्रमुख प्रकाश तेलगोटे ,उपशहर प्रमुख तानाजी मालुसरे, उपशहर संघटक रोहित श्रीधर म्हात्रे, सुरेश परदेशी, संजय पाटील, हेमंत म्हात्रे, विभाग प्रमुख शाम चौघुले, शाखा प्रमुख सुनील पवार, युवासेना विधानसभा अधिकारी आदित्य पाटील, उपविधानसभा अधिकारी कु.ऋतूनील पावसकर व सर्व शिवसैनिक उपस्थित होते.



## म ह त्त्वा चे

### सासरच्यांविरोधात गुन्हा दाखल

**रोहा :** लग्न झाल्यापासून पती, सासू सासरे यांनी संगणमत करून २५ वर्षीय सुनेचा मानसिक व शारीरिक छळ केल्या प्रकरणी सासऱ्याच्या मंडळींविरोधात पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. हा प्रकार रोह्यातील वरसे ग्रामपंचायत हद्दीतील भुवनेश्वर येथील निरलॉन कॉलनी येथे घडला आहे. शर्वरी शुभम कदम असे पीडित तरुणीचे नाव आहे. निरलॉन कॉलनी येथील शुभम शैलेश कदम याच्याबरोबर २० जानेवारी २०२४ रोजी लग्न केले. लग्नानंतर वारंवार पती शुभम कदम व सासू क्षमा शैलेश कदम व सासरे शैलेश कदम यांच्याकडून शारीरिक व मानसिक छळ करण्यात आला आहे. त्यामुळे या जाचाला कंटाळून अखेर सुनेने पोलिसात धाव घेऊन तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. अद्याप संशयित आरोपींना अटक केलेली नाही.

### सुरक्षारक्षक वेतनापासून वंचित

**पनवेल :** पीडब्ल्यूडी आस्थापनेवर तैनात असलेल्या सुरक्षारक्षकांना मागील सहा ते सात महिन्यांपासून वेतन मिळत नाही. त्यामुळे त्यांना आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. लवकरात लवकर त्यांचे वेतन करण्यात यावे अशा प्रकारचे पत्र रायगड जिल्हा सुरक्षारक्षक व बांधकाम कामगार मजदूर युनियन यांच्यातर्फे सरचिटणीस विनायक गांधी यांनी रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ खांदा कॉलनी यांना दिले आहे. रायगड जिल्हा सुरक्षारक्षक मंडळांतर्गत असलेल्या पीडब्ल्यूडी आस्थापनेवर तैनात करण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांना कामावर रुजू करून सहा- सात महिने झाले आहेत. मात्र या सुरक्षारक्षकांना आजतागायत केलेल्या कामाच्या वेतन रुपी मोबदला आस्थापनेकडून न झाल्यामुळे मंडळाकडून अदा करण्यात आलेला नाही. त्यामुळे त्या सुरक्षारक्षकांना कामावर येजा करण्यासाठी पैशांची चणचण भासू लागली आहे.

### चिमुकलीच्या अपहरणाचा डाव पोलिसांनी उधळला

**ठाणे :** बदलापूर येथील शाळेमध्ये लहान मुलींवर लैंगिक अत्याचाराची घटना घडली असतानाच, शुक्रवारी वर्तकनगर येथे अडीच वर्षांच्या मुलीच्या अपहरणाचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पीडित मुलीच्या आईने त्या व्यक्तीला पाहताच, त्याने मुलीला सोडून तेथून पळ काढला. याप्रकरणी वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर वर्तकनगर परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. एमएमआरडीएच्या रेंटल इमारती आहेत. विविध प्रकल्पात बाधित झालेल्या नागरिकांना येथे भाडेतत्त्वावर सदनिका देण्यात आल्या आहेत. या इमारतीमध्ये अडीच वर्षीय मुलगी तिच्या कुटुंबासोबत राहाते. शुक्रवारी सकाळी ती घराजवळील मोकळ्या जागेत खेळत असताना एक २५ ते ३० वयोगटातील व्यक्ती त्या ठिकाणी आला. मुलीला उचलत तो तेथून निघू लागला. त्याचवेळी मुलीच्या आईने हा प्रकार पाहिला. मुलीच्या आईने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या व्यक्तीने मुलीला तिच्या आईच्या अंगावर ढकलले आणि तेथून पळ काढला. याप्रकरणात मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गणेशोत्सवादरम्यान मुंबई-गोवा महामार्गावर अवजड वाहतूक बंदी

प्रतिनिधी
■ अलिबाग

गणेशोत्सवासाठी गणेशमूर्तींचे आगमन, गणेशमूर्तींचे विसर्जन, गौरी गणपती विसर्जन, परतीचा प्रवास आदींसाठी सार्वजनिक हितास्तव मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गावर वजनक्षमता 16 टनांपेक्षा जास्त वाहनांना बंदी करण्यात आली आहे. मुंबई ते सावंतवाडी दरम्यान जड वाहनांना बंदी असणार आहे.

गणेशोत्सवाच्या पूर्वतयारीचा प्रवास म्हणून 5 सप्टेंबर रोजी मध्यरात्री 12 वाजेपासून ते 8 सप्टेंबर रोजी रात्री 11 वाजेपर्यंत या कालावधीत बंदी असणार आहे. तर 5 व 7 दिवसांच्या गणेशमुर्तींचे विसर्जन, गौरी गणपती विसर्जन, परतीचा प्रवासासाठी 11 सप्टेंबर रोजी रात्री 8 वाजेपासून ते 13 सप्टेंबर रोजी रात्री 11 वाजेपर्यंत, अनंत चतुर्दशी 11 दिवसांचे



गणेशमुर्तीचे विसर्जन, परतीच्या प्रवासाकरिता 17 सप्टेंबर रोजी सकाळी 8 वाजेपासून ते 18 सप्टेंबर रोजी रात्री 8 वाजेपर्यंत बंदी राहील.

या महामार्गावर बंदी असलेल्या कालावधी व्यतिरिक्त उर्वरित कालावधीत ज्यांची वजन क्षमता 16 टन किंवा 16 टनांपेक्षा जास्त आहे, अशा वाहनांना 8 सप्टेंबर रात्री 11 वाजेपासून ते 11 सप्टेंबर रोजी सकाळी 8 वाजता आणि 13 सप्टेंबर रोजी रात्री 11 वाजेपासून ते 17 सप्टेंबर रोजी सकाळी 8 वाजेपर्यंत वाहतुकीस परवानगी राहील. तसेच सर्व वाहनांना 18 सप्टेंबर रोजी रात्री 8 वाजेनंतर नियमित वाहतुकीस परवानगी राहील.

हे निर्बंध दूध, पेट्रोल किंवा डिझेल, स्वयंपाकाचे गॅस सिलिंडर, लिक्विड मेडिकल ऑक्सिजन, अन्न धान्य, भाजीपाला व नाशवंत माल आदी जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही. तसेच मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 च्या रस्ता रूंदीकरण, रस्ता दुरूस्ती कामकाज आणि साहित्या, माल ने आण करणाऱ्या वाहनांना बंदी लागू राहणार नाही. यासंदर्भात वाहतूकदारांना संबंधित वाहतूक विभाग, महामार्ग पोलीस यांनी प्रवेशपत्र देण्याची कार्यवाही करावी. कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांचा आणि महामार्गांचा विचार करून पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि संबंधित जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक यांनी जड, अवजड वाहनांवरील वाहतुकीचे निर्बंध शिथिल करण्याबाबत प्राप्त परिस्थितीनुसार आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. तसेच जेएनपीटी व जयगड बंदरातुन आयात निर्यात मालाची वाहतूक सुरू राहील, याकरिता वाहतुकीचे नियोजन करण्यात यावे, असे सहसचिव राजेंद्र होळकर यांनी दिलेल्या आदेशात नमूद आहे.

# विरोधी पक्षातील नेत्यांच्या जाणीवा मेल्यात

## 'जाणीव जागर'मधून दरेकरांचे टिकास्त्र



प्रतिनिधी
■ महाड

एका चिमुरडीवर अत्याचार होतो आणि त्याचे घाणेरडे राजकारण सुरू असून हे निंदनीय आहे. त्याचा आम्ही धिक्कार, निषेध करतो. विरोधी पक्षाच्या महाविकास आघाडीतील नेत्यांच्या जाणीवा, संवेदना मेलेल्या आहेत, अशी बोचरी टीका भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी महाड येथील चवदार तळ्याजवळ आयोजित केलेल्या जाणीव जागर या कार्यक्रमातून केली.

महिला अत्याचार प्रकरणी महाविकास आघाडीच्या नेत्यांची दुतोंडी भुमिका राज्यातील जनतेसमोर उघड करण्यासाठी भाजपच्यावतीने आज जाणीव जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर, जिल्हा उपाध्यक्ष जयवंत दळवी, महाड तालुकाध्यक्ष निलेश देवगिरकर, तालुका सरचिटणीस अनिल मोरे, महेश शिंदे, चंद्रजित पालांडे, अक्षय ताडफळे, मंजुषा कुदमती, तालुका अध्यक्षा मंजुषा जोशी उपस्थित होते.

यावेळी बोलताना दरेकर म्हणाले की, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना बंद पाडण्यासाठी बदलापूरला जी घटना झाली तीचे राजकारण करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीने केला आहे. लाडकी बहीण योजनेला जो उदंड असा प्रतिसाद मिळतोय त्यामुळे उबाठा, काँग्रेस आणि शरद पवारांची राष्ट्रवादी धास्तावले असून त्यातूनच त्यांनी बंदचे आवाहन केले होते. महाराष्ट्राचे मणिपूर होतोय की काय असे भाकीत शरद पवारांनी वर्तवले होते. त्यामुळे राज्यात अशांतता, सामाजिक सुरक्षितता पसरतेय. हा केवळ योगायोग आहे की नियोजित डाव आहे. यांच्या हिंसक प्रवृत्ती निर्माण करण्याला महाराष्ट्रातील जनतेने बळी पडू नये, असे आवाहन दरेकर यांनी केले.

दरेकर पुढे म्हणाले की, कोलकाता येथे एका महिला डॉक्टरवर बलात्कार झाला त्याचा साधा निषेध उबाठा, काँग्रेस किंवा शरद पवार गटाने केला नाही. बदलापूरची झालेली घटना ही दुर्दैवीच आहे. त्याचे समर्थन कुणी करणार नाही. परंतु सरकारने सर्व प्रकारच्या ताकदीने कारवाया केल्या आहेत. आरोपीला अटक केली. निष्काळजीपणाला जबाबदार धरून अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले. आरती सिंग या आयजी दर्जाच्या ज्या आयपीएस महिला अधिकारी आहेत त्यांचे विशेष तपास पथक नेमले. ज्यांनी कसाबला फाशी देण्यास भाग पाडले त्या उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक केली. ज्या तातडीने गोष्टी करायच्या आहेत त्या सरकारने केल्या आहेत. परंतू याचे राजकारण या नालायक आणि नादान महाविकास आघाडीला करायचे असल्याचा आरोपही दरेकरांनी केला.

# संकल्प प्रतिष्ठानची यंदाची दहीहंडी 'लाडकी बहीण'ला समर्पित



प्रतिनिधी
■ ठाणे

गोविंदांची पंढरी म्हणून ठाणे शहराची ओळख आहे. ठाण्यातील काही प्रमुख दहीहंडी प्रसिद्ध आहेत. त्यांचा नावावर विश्वविक्रम झाला आहे. या दहीहंडी उत्सवांमध्ये संकल्प प्रतिष्ठानची दहीहंडी संपूर्ण महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. संकल्प प्रतिष्ठानाचा उत्सव आणि परंपरा यांचा अनोखा संगम आहे. संकल्प प्रतिष्ठानतर्फे विविध सण उत्सव हे समाजातील घटकांना एकत्रित आणून गुण्यागोविंदाने साजरे केले जातात. यंदाच्या दहीहंडी उत्सावाला लाडक्या बहीण योजनेची जोड दिली आहे. लाडक्या बहिणींसाठी विशेष सन्मान हंडी बांधण्यात येणार आहे.


'संकल्प प्रतिष्ठान आयोजित "संकल्प दहीहंडी उत्सव २०२४" याचे यंदा १९ वे वर्ष असून जागतिक विश्वविक्रम मोडणाऱ्या गोविंदा पथकास रोख २१ लाखांचे पारितोषिक दिले जाणार आहे. ठाणे शहरात सर्वप्रथम जे पथक पहिले नऊ थर लावेल त्या पथकास पथकास ११ लाखांचे बक्षीस देण्यात येईल आणि त्यानंतर ९ थर लावणाऱ्या पथकासही लाखोंची बक्षिसे देण्यात येणार आहेत.

# 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत पालिकेकडून पडताळणी प्रक्रियेत 1 लाखांहून अधिक अर्ज पात्र

- पहिल्या टप्प्यात 50 हजाराहून अधिक महिलांची लाभ रक्कम बॅंक खात्यात जमा
- दुस-या टप्प्यातही 50 हजारहून अधिक अर्ज पडताळणीअंती पात्र

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या नियोजनानुसार पडताळणी प्रक्रियेअंती नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातून 1 लाखाहून अधिक अर्ज पात्र झाले असून त्यापैकी पहिल्या टप्प्यात 50 हजाराहून अधिक पात्र महिलांच्या बॅंक खात्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्यांच्या लाभाची रक्कम रू. 3 हजार जमा झालेली आहे. त्यामुळे महिला भगिनींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



मुख्यमंत्री महोदयांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' जाहीर केल्यानंतर आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या 111 प्रभागांमध्ये योजनेची मदत केंद्रे सकाळी 8 ते रात्री 8 या वेळेत सुरू करण्यात आली व या केंद्रांव्दारे योजनेचे अर्ज भरून घेण्यात आले.

याशिवाय महापालिका क्षेत्रातील 226 अंगणवाड्यांमध्येही अंगणवाडी सेविकांव्दारे महिलांपर्यंत पोहोचून त्यांचे अर्ज भरण्याची कार्यवाही करण्यात आली.

# अभिनेत्री एकता जैन आणि आयुक्त कैलाश शिंदेची नारळी पौर्णिमेच्या उत्सवात हजेरी

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नारळी पौर्णिमा हा एक महत्त्वाचा हिंदू सण आहे, जो मुख्यतः महाराष्ट्र आणि कोकणातील मच्छिमार समाजाद्वारे साजरा केला जातो. या दिवशी लोक उपवास करतात, आपल्या बोटींना सजवतात आणि समुद्र देवता वरुणाची पूजा करतात, यावर्षी कोळी आगरी समाजाचे अध्यक्ष चंदू दादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली एरोली येथे श्रावण पौर्णिमेच्या दिवशी भव्य नारळी पौर्णिमेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात नवी मुंबईचे महापालिका आयुक्त कैलाश शिंदे आणि अभिनेत्री आणि इन्फ्लुएंसर एकता जैन यांनीही सहभाग घेतला. या उत्सवात पारंपरिक लोकगीते



सादर केली गेली, ज्याचा सर्वांनी आनंद घेतला. समुद्र देवतेची पूजा करण्यात आली आणि एकवीरा मातेची आरती करण्यात आली. या दरम्यान कैलाश शिंदे, एकता जैन आणि चंदू दादा पाटील यांचे हार घालून स्वागत करण्यात आले आणि अतिथींना एकवीरा मातेचे फ्रेम भेट देण्यात आले. महापालिका आयुक्त कैलाश शिंदे यांनी चंदू दादा पाटील यांचे या कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी कौतुक केले. तसेच उपस्थित मच्छिमारांना लाइफ जॅकेट वाटप करण्यात आले.अभिनेत्री एकता जैन यांनी या उत्सवात सहभागी होऊन आपली खुशी व्यक्त केली आणि चंदू दादा पाटील यांचे आभार मानले. त्यांनी लोकगीतांचा आनंद घेतला आणि या सणाची माहिती सोशल मीडियावर शेअर करण्याचे सांगितले.

# दिवा शिवसेना आयोजित भव्य आधारकार्ड शिबीर

प्रतिनिधी
■ दिवा

दिवा शिवसेना उपशहर प्रमुख तथा मा. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या वाढदिवसा निमित्ताने सद्गुरुवाडी येथील जनसंपर्क कार्यालयात दोन दिवसीय आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आधारकार्ड अद्ययावत करणे, नवीन आधार कार्ड काढणे, जन्मतारीख, मोबाईल नंबर लिंक करणे, आधारकार्डचे अपडेट्स करण्यासाठी मा. शैलेश पाटील यांच्या कार्यालयाच्या वतीने सदर शिबीर दि २४ व २५ ऑगस्ट रोजी होणार असून दिव्यातील गरजवंत लोकांना आवाहन करण्यात आले आहे.



सदर आधारकार्ड शिबिरास पहिल्याच दिवशी अनेक विद्यार्थी, वयोवृद्ध तसेच महिला व पुरुषांनी सहभाग नोंदवला. अनेकांच्या आधारकार्डात त्रुटी असलेल्यानी श्री पाटील यांच्या कार्यालयात जाऊन शिबिराचा फायदा घेतला प्रसंगी प्रचंड गर्दी झाल्याने सदर शिबीर आणखी एक दिवस सुरु ठेवणार असल्याचे स्पष्ट केले आहे. सदर शिबिराचे उद्घाटन शैलेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दिव्यातील शेकडो नागरिक व महिलांनी आधार कार्ड मधील त्रुटी दुरुस्त करून घेत आपला सहभाग नोंदवला.




**नवी मुंबई :** *वसई, नवी मुंबई, उरण, कोलकाता, बदलापूर अशा अनेक ठिकाणी देशात व महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचारात सातत्याने वाढ होत आहे. सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी, सुरक्षित समजल्या गेलेल्या मंदिरात, शाळेत अशा प्रत्येक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. एवढेच नव्हे तर अशा घटना दडपण्याचा प्रयत्न संबंधितांकडून केला गेला आहे. पोलीस यंत्रणेने देखील वेळ काढूपणा केल्याचे दिसून आले आहे. या सर्वांचा निषेध करण्यासाठी आणि गुन्हेगारांना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी करत अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेतर्फे काल संध्याकाळी कॉ. भाऊ पाटील चौक (अर्बन हाट समोर) बेलापूर येथे निषेध निदर्शने करण्यात आली.*

# कर्जत-माथेरान मिनी बसला 'ब्रेक'

प्रतिनिधी
■ माथेरान

माथेरानची जीवनवाहिनी असलेली महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाची मिनीबस सेवा चार-पाच दिवसापासून बंद आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे.कर्जत-माथेरान मिनीबसच्या दिवसभरात दहा फेऱ्या सुरू असून त्यातून कर्जत आगाराला चांगला महसूल मिळतो. तत्कालीन परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी, जास्त हॉर्स पॉवरच्या इंजिन आलेल्या दोन मिनीबस आठ वर्षांपूर्वी दिल्या होत्या. त्याच मिनीबस घाटरस्त्यावर सध्या धावत आहेत. कमी पैशात सुरक्षित प्रवास होत असल्याने स्थानिकांची मिनीबसमधील पसंती मिळत आहे. चार दिवसांपासून कोणतीही सूचना न देता मिनीबस बंद केली असून त्यामुळे प्रवाशांमधून संताप व्यक्त होत आहे.

माथेरानकरांना नवीन मिनीबस मिळणार म्हणून मोठा गाजावाजा करण्यात आला; पण आजतागायत या बस सेवेत दाखल न झाल्याने माथेरानकरांमधून नाराजी व्यक्त होत आहे. सण-उत्सवात बससेवा मिळणार का?चार दिवसांपासून मिनीबस सेवा पूर्णतः कोलमडून पडल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. प्रवासासाठी अतिरिक्त भुर्दंड सहन करावा लागतो. त्यामुळे महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळावर तीव्र नाराजी व्यक्त करत सण-उत्सवात तरी मिनीबस सेवा मिळणार का, असा प्रश्न स्थानिकांकडून उपस्थित होत आहे. .बसच्या इंजिनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने सेवा बंद आहे.

## अलिबागमध्ये बेकायदा कॉल सेंटरचा भांडाफोड

# सेक्सवर्धक गोळ्यांच्या नावाने सुरु होती 'डॉलर'मध्ये लूट

प्रतिनिधी
■ अलिबाग

सेक्स स्टॅमिना वाढविण्याच्या नावाखाली अमेरिकन नागरिकांना ठगवणाऱ्या बेकायदा कॉल सेंटरचा अलिबाग पोलिसांनी भांडाफोड केला आहे. गुरुवारी (22 ऑगस्ट) तालुक्यातील परहूर पाडा येथे केलेल्या या कारवाईत एका महिलेसह 33 जणांना अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे हे सर्वच्या सर्वजण महाराष्ट्राबाहेरचे आहेत. त्यांच्याकडून 55 मोबाईल, 31 संगणक-लॅपटॉप, 31 हेडफोनसह 85 लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पत्रकार परिषदेत याबाबतची माहिती दिली. यावेळी



अलिबागचे उपविभागीय पोलीस अधिकारी विनीत चौधरी, पोलीस निरीक्षक भुजबळ उपस्थित होते. परहूरमधील 'नेचर एज अलिबाग रिसॉर्ट'मध्ये हे बेकायदा कॉल सेंटर सुरु होते. हे बेकायदा कॉल सेंटर चालविणारे इंटरनेटच्या सहाय्याने संगणकावर लिंक पाठवून, ॲपवरुन अमेरीकेतील नागरिकांशी संपर्क साधायचे. त्यानंतर 'यु एस फार्मा' या अमेरीकन कंपनीचे प्रतिनिधी 'जॉन' बोलत असल्याचे सांगून, व्हायग्रा, श्रीयालीस, लिवीट्रो ही अमेरिकेत बंदी असलेली औषधे घरपोच पाठवून देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून पैसे उकळले जात होते. याकरिता गिफ्ट कार्डचा वापर केला जात होता. गिफ्ट कार्ड घेऊन ते रिडीम करुन पैसे हवालाव्दारे रोहीत बुटाने याच्याकडे जमा करुन ते भारतीय चलनात आणले जायचे.

याची माहिती मिळाल्यानंतर, गुरुवारी अलिबाग पोलिसांनी परहूर येथील या नेचर एज अलिबाग रिसॉर्टवर छापा टाकला. यावेळी रिसॉर्टच्या हॉलमध्ये हा गोरखधंदा सुरु असल्याचे दिसून आहे. एकूण 33 जणांना याठिकाणाहून अटक करण्यात आली. यामध्ये एका महिलेचाही समावेश आहे.

या कारवाईत पोलिसांनी 7 लाकडी काऊंटरवर 31 संगणक-लॅपटॉप, 31 हेडफोन, 31 किबोर्ड, 15 माऊस, इन्व्हर्टर, 31 खुर्च्या, व्हायफाय युनिट मोडेम, इतर लाकडी फर्निचर व मोबाईलसह 85 लाख 45 हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सुरु आहे.

# 'शक्ती कायदा' लागू करा!

## आ. सरनाईकांची पत्राद्वारे राष्ट्रपतींकडे मागणी

प्रतिनिधी
■ ठाणे

'शक्ती कायदा' लागू करा, अशी मागणी ठाण्यातील आमदार प्रताप सरनाईकांनी राष्ट्रपतींकडे पत्राद्वारे केली आहे. सरनाईकांनीच महाराष्ट्रात शक्ती कायदा विधेयक विधानसभेत मांडले होते. त्यानंतर ते दोन्ही सभागृहात सर्वानुमते मंजूरही झाले होते. परंतु या महत्त्वाच्या विधेयकाला महामहीम राष्ट्रपतींकडून अजूनही मंजूरी मिळालेली नाही. म्हणूनच आ. सरनाईकांनी राष्ट्रपतींकडे पत्राद्वारे याबाबतची मागणी केली आहे.

राज्यातील महिला, तरूणी व बालकांवर होणारे अत्याचार बंद व्हावेत, गुन्हेगारांना वचक बसावा याकरिता आंध्र प्रदेशच्या धर्तीवर



महाराष्ट्रात 'शक्ती कायदा विधेयक'' मी आमदार म्हणून महाराष्ट्र विधानसभेत मांडले होते व हे विधेयक एकमताने मंजूर झाले. हे शक्ती कायदा विधेयक विधानसभेत २३ डिसेंबर, २०२१ तर विधानपरिषदेत २४ डिसेंबर, २०२१ रोजी सर्वानुमते मंजूर झाले. महाराष्ट्रातील जनतेच्या वतीने आमदार म्हणून मी या शक्ती कायदा सुधारणा विधेयकाची मागणी त्यावेळी राज्य सरकारकडे केली होती व विधानसभेत हे विधेयक मांडल्यानंतर "शक्ती कायदा विधेयका" ला एकमताने मंजुरी देण्यात आली. विधानपरिषद व विधानसभेची मंजुरी मिळाल्यानंतर त्याचवेळी हे विधेयक महामहिम राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले. परंतू, अद्यापही या शक्ती कायद्याला अंतिम मंजुरी मिळाली नसल्याचे समजते. त्याकरिता महामहिम राष्ट्रपतींची अंतिम संमती मिळणे गरजेचे आहे. लहान बालके, तरूणीं, स्त्रिया यांच्यावर अत्याचार करणार्या नराधमास आरोपाली फाशी देण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. यासाठी शक्ती कायदा महाराष्ट्रात तात्काळ लागू होणे आवश्यक आहे. त्यासाठीच हे पत्र आपण महामहीम राष्ट्रपतींना पाठवल्याचे सरनाईकांनी म्हटले आहे.

## वरखेडी नदीने धोक्याची पातळी ओलांडली

**नंदुरबार :** नंदुरबार जिल्ह्यात होत असलेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील नदी नाले प्रवाहित झाले आहेत. अंकलेश्वर ब्रहानपूर राष्ट्रीय महामार्गावरून वाहणारी वरखेडी नदी धोक्याची पातळी ओलांडली असून दुथडी भरून वाहत आहे आणखीन काही तास पाऊस असाच सुरू राहिला तर अंकलेश्वर ब्रहानपूर महामार्ग ठप्प होणार. त्यासोबत वरखडी नदीला लागून असलेल्या अनेक गावांच्या संपर्क देखील तुटणार आहे. पावसामुळे वाहतूक कोंडी देखील होत असून नंदुरबार शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या विरचक धरणात देखील पाणी पातळी वाढ होत आहे त्यासोबत जिल्ह्यातील धरणांची देखील पाणी पातळी प्रचंड वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. येणाऱ्या आणखी काही तास असाच पाऊस सुरू राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आलेला आहे.



# पक्षफोडीची सुरुवात पवारांकडूनच!

## राज्यातील जातीयवादालाही पवारच कारणीभूत

**प्रतिनिधी**
■ नागपूर

राष्ट्रवादी काँग्रेसच्या जन्मापासूनच राज्यात फोडाफोडीचे व जातीयवादाचे राजकारण सुरू झाले. त्यांनीच जातीपातींत विष कालवण्याचे काम सुरू केले, असा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी केला. ते नागपूरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.





राज ठाकरे यांनी शनिवारी येथील रवीभवन येथे मनसे पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी विद्यमान सरकार व महाविकास आघाडीवर विशेषतः शरद पवार यांच्यावर अत्यंत तिखट टीका केली. राज ठाकरे म्हणाले की, राज्यात फोडाफोडीचे राजकारण शरद पवार यांनी सुरू केले. पुलोदच्या स्थापनेपासून हा प्रकार सुरू झाला. त्यांनी गणेश नाईक, नारायण राणे, छगन भुजबळ असे अनेक नेते फोडले. त्यानंतर जातीचे विषही त्यांनीच कालवले. 1999 मध्ये राष्ट्रवादीचा जन्म झाला. त्यावेळचा महाराष्ट्र पाहिला तर राष्ट्रवादीच्या जन्मापूर्वी महाराष्ट्रात केव्हाच महापुरुष व संतांची जातीपातींत विभागणी झाली नव्हती. पण 1999 नंतर असे घडण्यास सुरुवात झाली.

राज ठाकरे म्हणाले, मागच्या 5 वर्षांत राज्यात ज्या प्रकारचा राजकीय खेळ झाला, त्याला लोक कंटाळलेत. लोकसभेला 400 पारची घोषणा आणि संविधान बदलण्याच्या घोषणेमुळे मुस्लीम व दलित समाजाने एकगठ्ठा मतदान केले. हे मतदान अँटी मोदी व अँटी शहा असे होते. ते काही उद्धव ठाकरे, शरद पवारांसाठी मतदान नव्हते. ती वाफ आता निघून गेली आहे. त्यामुळे विधानसभेला गोष्ट वेगळी आहे. कारण 5 वर्षांपूर्वी मतदारांबरोबर जी प्रतारणा झाली, ते लोक विसरलेले नाहीत. या गोष्टीचा राग विधानसभेच्या निवडणुकीला नक्की काढतील. हे मला दौऱ्याच्या माध्यमातून दिसत आहे.

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणाचा चिखल झाला आहे. येथील मतदारांनी मागील 50 वर्षांत असा चिखल केव्हाच पाहिला नव्हता. मतदार ही गोष्ट केव्हाच विसरणार नाहीत. या गोष्टींचा राग ते आगामी विधानसभा निवडणुकीत निश्चितच काढतील, असे ते म्हणाले.

राज ठाकरे यांनी यावेळी बदलापूरच्या घटनेवरूनही सरकार व विरोधकांवर निशाणा साधला. ते म्हणाले, बदलापूरची घटना आमच्या कार्यकर्त्यांनी समोर आणली. या घटनेनंतर अशा घटनांची अक्षरशः फटाक्यांची माळ लागली. ही माध्यमांसाठी दररोजची एक बातमी असायला हवी होती. गत काही वर्षांत सरकारने महिला सुरक्षेशी संबंधित अनेक योजना आणल्या. कोट्यवधी रुपये खर्च केले. पण त्यानंतरही महिलांशी संबंधित अत्याचाराच्या घटनांत घट झाली नाही. ही सत्ताधारी व विरोधक यांच्यासाठीही शरमेची गोष्ट आहे. या घटनांमुळे देशातील प्रगत राज्य असलेल्या महाराष्ट्राची तुलना उत्तर प्रदेश व बिहारसोबत केली जात आहे.

राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्र किंवा देशात नवा गृहमंत्री आला तर त्याला कोणतीही माहिती नसते. याऊलट पोलिसांना सर्वकाही माहिती असतात. त्यामुळे सरकारने पुढाकार घेऊन त्यांना मोकळीक दिली तर गुन्हेगारीचे उच्चाटन होईल. सर्वकाही साफ होईल. एवढी ताकद महाराष्ट्र पोलिसांमध्ये आहे. पण दुर्दैवाने आतापर्यंतच्या कोणत्याही सरकारने त्यांना अशी मोकळीक दिली नाही.

पत्रकारांनी यावेळी राज ठाकरे यांना शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांच्याविरोधात उमेदवार देणार का? असा प्रश्न केला. त्यावर राज ठाकरे म्हणाले की, वरळी विधानसभेत आमची 37 ते 38 हजार मते आहेत. मागच्यावेळी आम्ही निवडणूक लढवली नाही. पण यावेळी आम्ही तिथे उमेदवार देणार आहोत. महाराष्ट्रात सर्वच ठिकाणी मनसे आपले उमेदवार देईल. त्यानुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याही विरोधात उमेदवार दिले जातील.

# जालन्यातील गजकेसरी स्टील कंपनीत बॉयलरचा स्फोट!

## वितळलेले लोखंड अंगावर पडून 22 कामगार जखमी

**प्रतिनिधी**
■ जालना

जालना एमआयडीसीत एक मोठी दुर्घटना घडली आहे. गजकेसरी स्टील नावाच्या कंपनीत बॉयलरचा भीषण स्फोट झाल्याने यात 22 कामगार जखमी झाले आहेत. तर यातील चौघांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे.



स्टील कंपनीत लोखंड वितळणाऱ्या भट्टीमध्ये स्फोट झाल्याने वितळलेले लोखंड अंगावर पडल्याने 22 जण जखमी झाले. सर्व जखमींना रुग्णालयात हलवण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांनी दिली आहे. तर काही कामगारांना उपचारासाठी छत्रपती संभाजीनगरातील रुग्णालयात आणण्यात आले.

घटना घडताच कंपनीला बंद करून आतमध्ये काम करणाऱ्या कामगारांचे मोबाईल हिसकावण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलिस अधीक्षक अजय कुमार बन्सल, उपपोलिस अधीक्षक पीयूष निपाणीसह चंदनझिरा पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व पोलिसांनी धाव घेऊन घटनेची चौकशी सुरु केली आहे. जालना अद्योगिक वसाहतीत नेहमी किरकोळ घटना घडत असतात, याची माहिती लपवली जाते. तसेच पोलिसही माहिती देण्यास टाळाटाळ करतात, अशी तक्रार काही स्थानिक लोकांनी केली आहे.

जालना शहराचे स्टील कंपन्यांसाठी महाराष्ट्रात नव्हे तर देशांमध्ये देखील नाव घेतले जाते. यामध्ये प्रामुख्याने राजुरी स्टील, कालिका स्टील ,पोलाद, नामवंत कंपन्या जालना शहरांमध्ये आहेत. सुमारे 25 स्टील कंपन्या एकमेव जालना शहरामध्ये आहेत. या कंपनीमध्ये बाहेरील राज्यातील जवळपास 40 ते 50 हजार कामगार काम करत असतात. आतापर्यंत झालेल्या दुर्घटनांमध्ये अनेक कामगारांना आतापर्यंत आपला जीव गमावा लागलेला आहे तर काही लोकांना अपंगत्व देखील आलेले आहे. त्यामुळे पोलिसांनी आणि प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे अशी मागणी करण्यात आली.

## आरएसएसशी संबंधित वीज कंत्राटी कामगार संघाचे ठिय्या आंदोलन

**प्रतिनिधी**
■ नागपूर

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित आणि भारतीय मजदूर संघाशी संलग्नित महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाने वीज कंपन्यांतील कंत्राटी कामगारांच्या प्रश्नावर शनिवारी रेशीमबाग मैदानातून ऊर्जामंत्री यांच्या निवासस्थानी मोर्चा काढला. पोलिसांनी हा मोर्चा संविधान चौकात अडवला. तेव्हा आंदोलकांनी चौकातच ठिय्या आंदोलन सुरू केले. दरम्यान मागणी पूर्ण होत नाही तोवर मागे हटणार नाही, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे.




भारतीय मजदूर संघाशी संलग्नित महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाकडून गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने महावितरण, महापारेषण, महानिर्मिती या कंपन्यांकडे कार्यरत कंत्राटी वीज कामगारांना सेवेत कायम करावे, वेतनवाढ व हरयाणा सरकार प्रमाणे वीज उद्योगात कंत्राटदार विरहित शाश्वत रोजगार देण्याच्या मागणीसाठी आंदोलन केले जात आहे.

वीज कंपन्यांतील सुमारे ४५ हजार कंत्राटी कामगारांच्या हक्कासाठी शेवटी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाने शनिवारी रेशीमबाग मैदानातून थेट ऊर्जामंत्र्यांच्या निवासस्थानावर दुपारी १२ वाजता मोर्चा काढला. आंदोलनात मोठ्या संख्येने कंत्राटी कामगार सहभागी झाले. हा मोर्चा संविधान चौकात पोलिसांनी रोखला. त्यानंतर आंदोलकांनी येथे ठिय्या देत आमरण उपोषण सुरू केले. यावेळी आंदोलकांना पोलिसांनी फडणवीस यांच्याशी देवगिरीवर बैठक घडवून देण्याचे आश्वासन दिले.

## कंटेनरला पाठिमागून दुचाकीची जोराची धडक; दोघांचा जागीच मृत्यू

**प्रतिनिधी**
■ कणकवली

मुंबई - गोवा महामार्गावर वागदे येथील एका हॉटेलनजीक पहाटे २.३० वाजता उभ्या असलेल्या कंटेनरला पाठिमागून दुचाकीची जोराची धडक होवून दोघा युवकांचा जागीच मृत्यू झाला. संकेत नरेंद्र सावंत (वय २४, कणकवली परबवाडी) व साहिल संतोष भगत (२३, कणकवली विद्यानगर) अशी मृतांची नावे आहेत. कणकवली शहरातील या दोन्ही युवकांचे अपघाती निधन झाल्याचे वृत्त समजताच सर्वत्र हळहळ व्यक्त होत होती.



याबाबत माहिती अशी की, मुंबई गोवा-महामार्गावर एका हॉटेलनजीक कंटेनर महामार्गावर उभा असताना कणकवली येथुन ओरोसच्या दिशेने जाणाऱ्या या दुचाकीची पाठिमागून कंटेनरला धडक झाली. अपघाताची माहिती कणकवली पोलिस व जिल्हा वाहतूक पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी संकेत सावंत व साहिल भगत बेशुध्द अवस्थेत पडले होते. पोलिसांनी त्यांना कणकवली उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिका-यांनी सांगितले.

## कामशेत परिसरात 57 लाखांचा गांजा जप्त, चौघे अटकेत

■ लोणावळा

कामशेत भागात पोलिसांनी ५७ लाख रुपयांचा ९८ किलो गांजा जप्त केला. या कारवाईत पोलिसांनी चौघांना अटक केली. अभिषेक अनिल नागवडे (वय २४), प्रदीप नारायण नामदास (वय २५), योगेश रमेश लगड (वय ३२) वैभव संजीवन चेडे (वय २३, चौघे रा. कारेगाव, ता. शिरूर, जि. पुणे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहे. याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध कामशेत पोलिसांनी गुन्हा दाखल केला. मळवली ते लोणावळा दरम्यान मोटारीतून गांजा विक्रीस आणण्यात येणार असल्याची माहिती कामशेत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून मोटार थांबविली. मोटारीची तपासणी करण्यात आली. तेव्हा मोटारीमध्ये पोत्यात गांजा सापडला. पोलिसांनी नागवडे, नामदास, लगड, चेडे यांना ताब्यात घेतले. आरोपी गांजाची विक्री कोणाला करणार होते, यादृष्टीने तपास करण्यात येत आहे.

## पुणे शहर आणि जिल्ह्याला रेड अलर्ट

### खडकवासलातून 23000 क्युसेक्स पाण्याचा विसर्ग

**प्रतिनिधी**
■ पुणे

पुणे जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू असून नदीनाल्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. धरणांच्या पाणी पातळतीही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे धरणांमधून पाण्याचा मोठा विसर्ग सुरू आहे. खडकवासला धरणातूनही २३ हजार क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू झाला असून मुळा मुठा नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. पुण्यातील डेक्कन जवळ असलेला भिडे पूल पाण्याखाली गेला असून नदीपात्रातील दोन्ही बाजूचे रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे मोठ्याप्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे.



खडकवासला धरणातून पाणी सोडल्याने महापालिकेच्या समोर चार चाकी वाहने पाण्यात अडकून पडली आहेत. काही वाहने पोलीस अग्निशमन दल याच्या मदतीने काढली जात आहेत.खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवल्याने नदीचं पाणी पात्राबाहेर पडण्याची शक्यता आहे. धरणातून पाण्याचा विसर्ग वाढत असून अग्निशमन दलाकडून नागरिकांना याबाबत मेगाफोन्सद्वारे दक्षता घेणेबाबत सूचना केल्या जात आहे.

नदीपात्रातील रस्ता वाहतुकीसाठी बंद केल्याने पुण्यातील पेठांमध्ये प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवल्यानंतर पुण्यातील नदी पात्रातील रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. भिडे पूल देखील पाण्याखाली गेला आहे. नदीपात्रातील रस्ता वाहतुकीसाठी बंद झाल्यानंतर पेठांध्ये मोठी वाहतूक कोंडी झाली आहे.

हवामान विभागाने पुणे जिल्ह्यात दिनांक 24 व 25 ऑगस्ट 2024 रोजी रेड अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यात घाट माथा व काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तवली आहे. सद्यस्थितीत पुणे जिल्ह्यातील धरणांमधून पाणी सोडण्यात आले असुन त्यात वाढ होण्याची श्यक्यता आहे. नागरिकांनी दक्षता घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## भाजप आमदार जयकुमार गोरेंच्या ताफ्यातील कारने दुचाकीला उडवलं, दोघांचा जागीच मृत्यू

**प्रतिनिधी**
■ सातारा

माण-खटावचे भाजपा आमदार जयकुमार गोरे यांच्या ताफ्यातील स्कार्पिओ कारने स्कूटीला उडवल्यानं दोन जण जागीच ठार झाले आहेत. रणजित राजेंद्र मगर (वय ३२) आणि अनिकेत नितीन मगर (वय २६), अशी मृतांची नावं आहेत. शनिवारी सकाळी शेरेवाडी फाटा (ता. माण) येथे हा अपघात झाला. मृतांपैकी रणजित हा विवाहित होता. या अपघातात स्कूटीचा आणि स्कार्पिओच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला आहे.



जनसंवाद दौऱ्यावर जात असताना अपघात - घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार अनिकेत आणि रणजित हे शेरेवाडी फाट्यावरून बिदालच्या दिशेने स्कूटीवरून (क्र. एम. एच. ११ डी. के. ८४५५) निघाले होते. यावेळी भाजपा आमदार जयकुमार गोरे यांचा ताफा जनसंवाद दौऱ्यावर दहिवडीच्या दिशेनं निघाला होता. शेरेवाडी फाटा येथे आ. गोरेंच्या ताफ्यातील स्कार्पिओ चालकाला गाडीवर नियंत्रण मिळवता न आल्याने समोरून येणाऱ्या स्कूटीला स्कार्पिओ कारने उडवलं. रुग्णालयात नेण्यापूर्वीच दोघांचा मृत्यू - या भीषण अपघातात गंभीररित्या जखमी झालेल्या अनिकेत आणि रणजित या दोघांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र, तत्पूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. या अपघाताची बातमी दहिवडी परिसरात वाऱ्यासारखी पसरली.

## 2 अल्पवयीन मुलींवर आश्रमचालकानेच केला अत्याचार

### आरोपी जेरबंद, छत्रपती संभाजीनगरमधील घटना

**प्रतिनिधी**
■ संभाजीनगर

आध्यात्मिक शिक्षणासाठी आश्रमात राहाणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींवर आश्रमचालकानेच अत्याचार केल्याची घटना छत्रपती संभाजीनगरमध्ये घडलीय. दादासाहेब अकोलकर (वय 67) या आरोपीविरुद्ध कन्नड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कन्नड तालुक्यातील हतनूर शिवारात गेल्या दहा वर्षांपासून आध्यात्मिक शिक्षण, वादन, गायनाचे प्रशिक्षण देण्यासाठी आश्रम चालवण्यात येतो. या आश्रमातील मुली जवळच असलेल्या एका शाळेत शिक्षण घेतात आणि शाळा सुटल्यानंतर आश्रमात परत येतात.

आश्रमचालक दादासाहेब पुंडलिक अकोलकर याने दोन अल्पवयीन मुलींना आपल्या खोलीत बोलावून लज्जा वाटेल असेल कृत्य करत लैंगिक अत्याचार केले. शिवाय, या घटनेची वाच्यता केल्यास आश्रमातून हाकलून देण्याची धमकी दिली. पीडित मुलींच्या फिर्यादीवरून दादासाहेब पुंडलिक अकोलकर ऊर्फ दादा महाराज याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## निगडीतील शाळेत शिक्षकानं केला विद्यार्थिनीचा विनयभंग

### शिक्षकासह सात जणांना अटक

■ पुणे

बदलापूर येथील दोन चिमुकल्या मुलींवर शाळेतील शिपायानं लैंगिक अत्याचार केल्याची घटना ताजी असतानाच निगडीत असाच धक्कादायक प्रकार समोर आलाय. सहा वर्षांपूर्वी शाळेतील एका मुलीशी अश्लील चाळे केल्याप्रकरणी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झालेल्या पीटीच्या शिक्षकानं या गुन्ह्यात जामिनावर बाहेर आल्यानंतर पुन्हा त्याच शाळेतील तेरा वर्षांच्या मुलीचा विनयभंग करुन तिचा लैंगिक छळ केल्याचा प्रकार समोर आलाय. याप्रकरणी शिक्षकासह सात जणांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात मुलीच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीवरून निगडी पोलिसांनी शिक्षक आणि संबंधित शाळेच्या संचालकांविरोधात बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करून त्यांना तत्काळ अटक केली आहे. निगडी प्राधिकरणातील शाळेत ही धक्कादायक घटना घडली. शाळेतील पीटी शिक्षक निवृत्ती देवराम काळभोरने एका विद्यार्थिनीचा वारंवार विनयभंग करून तिचा लैंगिक छळ केला. 2022 ते 2024 या दोन वर्षांत मुलीचा वारंवार छळ करण्यात आल्याचं तक्रारीत म्हटलंय.आरोपी निवृत्ती काळभोर याच्याविरुध्द निगडी पोलीस ठाण्यात 2018 मध्ये शाळेतील एका अल्पवयीन मुलीशी अश्लील चाळे केल्याप्रकरणी पॉक्सो कायद्याअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.


# शेतकऱ्यांना कर्जमाफी नको कर्जमुक्त करा

## मनोज जरांगेंचा सरकारला 30 सप्टेंबरचा अल्टीमेटम

**प्रतिनिधी**
■ जालना

सरकारने ३० सप्टेंबरच्या आत शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे, कर्जमुक्ती कशी होत नाही, हेच पाहतो, असा नवा अल्टीमेटम मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला दिला. सरकारने ३० सप्टेंबरच्या आत कायमची कर्जमुक्ती करायची, सगळा पिकविमा, अनुदान द्यायचे. आता शेतकऱ्याच्या पिकाला भाव कसा मिळत नाही हे आम्ही बघतो, असे इशारा देखील जरांगे यांनी दिला.

आगामी विधानसभा निवडणूक लढण्याच्याबाबत मनोज जरांगे चाचपणी करत आहेत. त्यांच्या आवाहनानंतर इच्छुकांनी विधानसभेच्या संपूर्ण माहितीसह गर्दी केली आहे. आतापर्यंत सातशे ते आठशे अर्ज आली असतील. छाननी सुरू आहे, आणखी काही इच्छुक भेट आहेत, अशी माहिती जरांगे यांनी दिली. विरोधात बोलणारेही तुमच्या भेटीला येत आहेत, या प्रश्नावर जरांगे म्हणाले की, ही गोरगरीब समाजाची लढाई आहे. जातीधर्माच्या विरोधात काम केल, त्याचा त्यांना पश्चाताप झाला हेच महत्त्वाचं. मराठ्यांच्या मता शिवाय कोणताच पक्ष निवडून येत नाही हे त्यांना माहिती आहे, असे जरांगे म्हणाले.



दरम्यान, जरांगे यांनी आता शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा प्रश्न हाती घेतला आहे. ते म्हणाले, शेतकरी म्हणजे आपणच, त्याला किती दिवस फसवायचं, कर्जमाफी नको कर्जमुक्ती करा कायमची. तुम्ही कर्जमुक्ती केल्यानंतर कर्जही देऊ नका. शेतकऱ्यांना ज्या सुविधा लागतात त्या द्या. त्यांना कायमची वीज द्या, पाण्याची सुविधा करा, अशी मागणी जरांगे यांनी केली. तसेच शेतमालाला भाव दिला तर शेतकरी आत्महत्या होऊच शकत नाहीत, असा दावाही जरांगे यांनी केला. पिकं विमा भरल्यावर तो मिळत नाही. सरकारचा या कंपन्यांवर धाक कसा नाही. त्यांच्याकडून टॅक्स घेत नाहीत का ? विना परवाने चालतात का कंपन्या? असा सवाल जरांगे यांनी करत सर्व शेतकऱ्यांना पिक विमा मिळाले पाहिजे, अशी मागणी केली. पिक विमा कंपन्यांचे संरक्षण करून शेतकऱ्याला मारता का? असा जाब विचारात जरांगे यांनी या कंपन्याकडे सुद्धा आम्ही लक्ष देणार आहोत असा इशारा दिला. पैसे घेताना गोड वाटते अन् विमा देताना हे कागद आणा ते आणा असे करता. दुसरीकडे सरकार म्हणते कंपन्या बाहेरच्या आहेत. त्या कंपन्या काय देशा बाहेरच्या आहेत का ? तुम्हाला तिकडे जाता येत नाही. किती फसवणार शेतकऱ्यांना, असे म्हणत जरांगे यांनी सरकारचा चांगलाच समाचार घेतला.

# आगामी विधानसभा निवडणुकीत 'मविआ'ला धडा शिकवा - आठवले

**प्रतिनिधी**
■ खेड

वेळ आली तर देईन मी जान; पण कुणालाच बदलू देणार नाही मी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान अशी काव्यमय सुरुवात करून संविधान कोणीही बदलू शकत नाही.मात्र संविधान बदलण्याची खोटी अफवा पसरवून तरुणांना मध्ये गैरसमज निर्माण करणाऱ्या महविकास आघाडीला आगामी विधानसभा निवडणुकीत धडा शिकवा असे आवाहन आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केले.



खेड येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन हे 3 कोटी 50 लाख निधी खर्च करून उभारण्यात येणार आहे त्याचे भूमिपूजन आज ना.रामदास आठवले यांच्या हस्ते झाले त्यावेळी झालेल्या जाहीर सभेत ना.रामदास आठवले बोलत होते. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे गाव आंबडवे हे मंडणगड तालुक्यात आहे.त्या गावात डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य दिव्य स्मारक उभारणार असल्याचा संकल्प ना.रामदास आठवले यांनी यावेळी जाहीर केला.

यावेळी तिसऱ्यांदा केंद्रीय राज्यमंत्री झाल्याबद्दल ना.रामदास आठवले यांचा भव्य सत्कार करण्यात आला.यावेळी शिवसेने चे ज्येष्ठ नेते माजी मंत्री रामदास कदम दापोली चे आमदार योगेश कदम आणि रिपब्लिकन पक्षाचे नेते अनेक मान्यवर नेते उपस्थित होते.

## गोपाळकाला आणि अनंत चतुर्दशी निमित्त स्थानिक सुट्टी जाहीर

**मुंबई :** गोपाळकाला (दहीहंडी) निमित्त मंगळवार २७ ऑगस्ट २०२४ आणि अनंत चतुर्दशी निमित्त मंगळवार १७ सप्टेंबर २०२४ रोजी मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयांना एक परिपत्रका द्वारे स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ठाणे जिल्हयातील महानगरपालिका कार्यालयांसह, मुंबईतील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयातील कामगार/कर्मचा-यांना परिपत्रकातील तरतूदी सापेक्ष (सफाई, रुग्णालये, दवाखाने, प्रसुतीगृहे, जलकामे, विद्युत धुलाई केंद्र, अग्निशमन, उदंचन केंद्र, सुरक्षा, देवनार पशुवधगृह, आपत्कालीन व्यवस्थापन ह्या अत्यावश्यक सेवा वगळून) गोपाळकाला (दहीहंडी) निमित्त मंगळवार दिनांक २७ ऑगस्ट २०२४ आणि अनंत चतुर्दशी निमित्त मंगळवार दिनांक १७ सप्टेंबर २०२४ रोजी स्थानिक सुट्टी राहणार आहे.



## कोहलीची ऑटोग्राफवाली जर्सी 40 लाख रुपयांना विकली

- राहुल-अथियाने केला चॅरिटी ऑक्शन
- एकूण 1.93 कोटी रुपये जमवले

प्रतिनिधी
■ मुंबई

गरजू मुलांना मदत करण्यासाठी, भारतीय फलंदाज केएल राहुल आणि त्याची पत्नी अथिया शेट्टी यांनी शुक्रवार, 23 ऑगस्ट रोजी एका धर्मादाय लिलावाचे आयोजन केले होते. येथे भारतीय क्रिकेटपटूंच्या ऑटोग्राफ केलेल्या वस्तूंचा लिलाव करण्यात आला. या काळात विराट कोहलीने स्वाक्षरी केलेल्या जर्सीसाठी सर्वाधिक 40 लाख रुपयांची बोली लागली.

विप्ला फाउंडेशनसाठी 'क्रिकेट फॉर चॅरिटी' या नावाने हा लिलाव करण्यात आला. यामध्ये विराट कोहली, एमएस धोनी, रोहित शर्मा आणि केएल राहुलसारख्या स्टार खेळाडूंच्या ऑटोग्राफ केलेल्या वस्तूंचा लिलाव करण्यात आला. या लिलावासाठी एकूण 1.93 कोटी रुपये जमा झाले. या पैशातून दिव्यांग मुलांच्या शिक्षणाचे काम केले जाणार आहे.

या चॅरिटी लिलावात स्टार क्रिकेटर विराट कोहलीच्या वस्तू सर्वात महाग विकल्या गेल्या. त्याच्या स्वाक्षरी केलेल्या जर्सीशिवाय त्याच्या बॅटिंग ग्लोव्हजसाठी 28 लाख रुपयांची बोली लागली. याशिवाय भारतीय कर्णधार रोहित शर्माची बॅट 24 लाख रुपयांना आणि बॅटिंग ग्लोव्हज 7.5 लाख रुपयांना विकले गेले.

## शिखर धवनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

प्रतिनिधी
■ मुंबई



भारताचा अनुभवी सलामीवीर शिखर धवनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. धवनने भारतासाठी 34 कसोटी, 167 एकदिवसीय आणि 68 टी-20 सामने खेळले आहेत.

38 वर्षीय धवन चाहत्यांमध्ये गब्बर या नावाने प्रसिद्ध आहे. तो त्याच्या दमदार फलंदाजी आणि अष्टपैलू स्वभावासाठी ओळखला जातो. बेधडक ओपनिंगसाठीही त्याला पसंती दिली जाते. धवनने रोहित शर्मासोबत वनडेमध्ये 18 शतकी भागीदारी केली आहे. शिखरने पदार्पणाच्या कसोटीत 187 धावांची इनिंग खेळली होती. पदार्पणाच्या कसोटीत सर्वाधिक धावा करणारा तो भारतीय फलंदाज आहे.

2019 एकदिवसीय विश्वचषकादरम्यान, पॅट कमिन्सचा चेंडू ऑस्ट्रेलियाविरुद्ध शिखर धवनच्या अंगठ्याला लागला. 150 किमी प्रतितास वेगाने चेंडू लागल्याने धवनचा अंगठा तुटला, मात्र शिखरने तुटलेल्या अंगठ्याने फलंदाजी सुरूच ठेवली. या सामन्यात त्याने शतक झळकावले. त्याने 117 धावांची खेळी खेळली. धवनने याला आपले आवडता प्लेयर म्हटले होते.

या सामन्यात धवनने रोहित शर्मासोबत 127 धावांची आणि विराट कोहलीसोबत 93 धावांची सलामी दिली होती. धवनच्या खेळीत 16 चौकारांचा समावेश होता. भारताने हा सामना 36 धावांनी जिंकला.

धवनचा ताल ठोक किंवा कबड्डी स्टाईल सेलिब्रेशन चाहत्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. जेव्हा तो झेल घेतो तेव्हा मैदानावर टाळ्या वाजवून आनंद साजरा करतो. ऑस्ट्रेलिया दौऱ्यात शेन वॉटसनचा झेल घेतल्यानंतर पहिल्यांदाच त्याने हे सेलिब्रेशन केले, जे खूप आवडले होते. या सेलिब्रेशननंतर चाहत्यांनी त्याला गब्बर ही पदवी दिली. हा उत्सव त्याचा ट्रेडमार्क बनला.

या सेलिब्रेशनवर धवन म्हणतो, 'मला कबड्डी पाहायला आवडते. मला हे खूप मनोरंजक वाटते. हे सर्व मी मनापासून करतो. कदाचित त्यामुळेच चाहत्यांनाही ते आवडत असेल. मी जेव्हाही सीमारेषेवर क्षेत्ररक्षण करतो तेव्हा मला चाहते माझे अनुकरण करताना आणि कबड्डी शैलीत आनंद साजरा करताना दिसतात.

धवनने त्याचा शेवटचा एकदिवसीय सामना 10 डिसेंबर 2022 रोजी चट्टोग्राम येथे खेळला. हा त्याचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामनाही होता. या दौऱ्यापूर्वी श्रीलंका दौऱ्यावर धवनला भारतीय संघाचा कर्णधार बनवण्यात आले होते. त्यानंतर त्याला संघातून वगळण्यात आले, जरी त्या वर्षी धवनने सर्व फॉरमॅटमध्ये हजाराहून अधिक धावा केल्या होत्या.

## जादूटोणा विरोधी कायदा राष्ट्रीय पातळीवर पास करावा - अंनिस

प्रतिनिधी
■ मुंबई

काल गुजरात विधानसभेने एकमताने 'नरबळी व इतर अमानुष, अघोरी व दुष्कर्मी प्रथा आणि जादूटोणा (काळी जादू) अधिनियम (२०२४)' हे विधेयक पास केले आहे. या अधिनियमाचा मसूदा गुजरात राज्याचे गृह राज्य मंत्री हर्ष संघवी यानी हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सादर केला. भाजप या सत्ताधारी पक्षासह प्रमुख विरोधी पक्ष, काँग्रेसने या अधिनियमास संपूर्णपणे मान्यता दिली. महाराष्ट्रात सातत्याने जादूटोणा विरोधी कायद्याला विरोध करणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या गुजरात मधील सरकारने सरकारने उशिराने का होईना हा कायदा करणे हे स्वागतार्ह पाऊल आहे, असे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मार्फत काढलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

अंनिसच्या पत्रकात पुढे म्हटले आहे की, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या बलिदानानंतर महाराष्ट्र शासनाने 2013 साली केलेल्या जादूटोणाविरोधी कायद्यातील अनेक तरतुदी या काल गुजरात सरकारने केलेल्या कायद्यामध्ये समाविष्ट आहेत. काँग्रेस आणि भाजप या दोन्ही ही भारतातील प्रमुख राज्यांच्या मध्ये आता जादूटोणा विरोधी कायदा असल्याने राष्ट्रीय पातळीवर असा कायदा करायला आता कोणतीच अडचण येवू नये. सर्व पक्षांनी याबाबत तातडीने सहमती करून राष्ट्रीय पातळीवर देखील जादूटोणा विरोधी कायदा पारित करावा अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मार्फत डॉ. हमीद दाभोलकर, मिलिंद देशमुख यांनी केली आहे. राष्ट्रीय पातळीवर असा कायदा करताना हा कायदा अजून व्यापक करावा अशी देखील मागणी करण्यात आली आहे .

## रोहित शर्मासाठी रेकॉर्डब्रेक बोली लावणार दिल्ली व लखनौ, आयपीएलमधला सर्वात श्रीमंत खेळाडू ठरणार

प्रतिनिधी
■ मुंबई



रोहित शर्माला आता मुंबई इंडियन्स आपल्या संघात कायम ठेवणार नसल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे रोहित शर्मा IPL 2025 च्या मोठ्या लिलावात रोहित शर्मा असेल, असे आता समोर येत आहे. पण या लिलावात दिल्ली कॅपिटल्स आणि लखनौ सुपर जायंट्स हे दोन्ही संघ रोहितला आपल्या संघात घेण्यासाठी कितीही रक्कम मोजण्यासाठी तयार आहेत. त्यामुळे रोहितवर या लिलावात रेकॉर्डब्रेक बोली लागणार असल्याचे समोर आले आहे. रोहितवर सर्वाधिक म्हणजे किती बोल लागू शकते, हेदेखील आता समोर आले आहे.


रोहित शर्माने फार कमी वेळेत मुंबई इंडियन्सची कमान सांभाळली. आयपीएलमध्ये रोहितचा पगार २०१४ मध्ये १२.५० कोटी एवढी होती. त्यानंतर चार वर्षांनी रोहित शर्माचा पगार वाढला. रोहितला २०१८ मध्ये १५ कोटी रुपये देण्यात आले. त्यानंतर २०२२ मध्ये मुंबई इंडियन्सने रोहितसाटी १६ कोटी रुपये मोजले. आता २०२५ मध्ये मुंबईने रोहित शर्माला रिलीज केलं, तर त्याच्यावर विक्रमी बोली लागू शकते असे समोर येत आहे.

दिल्ली कॅपिटल्सचा संघ सुरुवातीपासून आयपीएलमध्ये आहे. दिल्लीच्या संघाने बरेच कर्णधार बदलले, पण त्यांना एकदाही जेतेपद पटकावता आले नाही. त्यामुळए दिल्लीच्या संघाला रोहित शर्मासारखा कर्णधार हवा आहे. दुसरीकडे लखनौच्या संघावर गेल्या वर्षी नामुष्की ओढवली होती. कर्णधार लोकेश राहुल आणि संघमालक यांची भांडणंही मैदानात झाली होती. त्यामुळे लखनौच्या संघाला चांगल्या कर्णधाराची नितांत गरज आहे. दिल्ली आणि लखनौ या दोन्ही संघांनी ठरवले आहे की, रोहित शर्मा हा आपल्याच संघात असायला हवा. त्यासाठी हे दोन्ही संघ कितीही किंमत मोजायला तयार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार रोहित शर्मासाठी दिल्ली आणि लखनौ हे दोन्ही संघ ५० कोटी रुपयांपर्यंतही जाऊ शकतात. आतापर्यंत एवढी रक्कम आयपीएलच्या हंगामात एकाही खेळाडूला मिळालेली नाही.

आयपीएलच्या २०२४ च्या हंगामापूर्वी झालेल्या मिनी ऑक्शनमध्ये ऑस्ट्रेलियाचे पॅट कमिन्स आणि मिचेल मार्शवर २० आणि २४ कोटी रुपयांची आतापर्यंतची सर्वाधिक बोली लागली होती. पण २०२५ मध्ये रोहित शर्मा ऑक्शनसाठी उपलब्ध झाला तर यापेक्षाही विक्रमी बोली त्याच्यावर लागू शकते असं जाणकार सांगतात. रोहित शर्माला लागलेली बोली आयपीएलच्या इतिहासातील सर्वोत्तम असेल, असे आता म्हटले जात आहे.

## चित्रकार अस्लम मुल्लांच्या 'माईंडस्केप'चे जहांगीर कला दालनात चित्र प्रदर्शन

प्रतिनिधी
■ मुंबई




सुप्रसिद्ध चित्रकार अस्लम मुल्ला यांच्या 'माईंडस्केप' या आगळ्यावेगळ्या संकल्पनेवर आधारित चित्रांचे प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी येथे सुरू आहे. नुकतेच या चित्रपटदर्शनाचे उद्घाटन पार पडले. अस्लम मुल्ला यांचे माइंडस्केप चित्रांचे प्रदर्शन रविवार 25 ऑगस्ट पर्यंत सकाळी 11 ते 7 या वेळेत सुरू राहणार आहे.

अस्लम मुल्ला यांनी आतापर्यंत देशभरात विविध ठिकाणी आपले चित्रांचे प्रदर्शन आणि ग्रुप शोज केले असून त्यांच्या चित्रांचा एक चाहता वर्ग निर्माण करण्यात ते यशस्वी झाले आहे. अमूर्त किंवा अंशतः अमूर्त अशा शैलीतील चित्र रेखाटताना विविध प्रयोग करण्यावर चित्रकार असलम मुल्ला यांचा भर असतो. बंधनातही अमाप स्वातंत्र्य असते. स्थिरते मध्येही निरंतर चालणारी एक प्रक्रिया सुरू असते. व्यक्त - अव्यक्ततेच्या सगळ्या शक्यता आणि अशक्यतांचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न म्हणजे माइंडस्केप असे चित्रकाराचे म्हणणे आहे.

माईंडस्केप चित्र प्रदर्शन रविवार 25 ऑगस्ट पर्यंत पूर्ण सप्ताहाभर जहांगीर कलादालन, काळा घोडा येथे चालणाऱ्या चित्र दर्शनात चित्रकार असलम मुल्ला यांच्या विविध पेंटिंग्स रसिकांना पाहता येणार आहेत. रसिक आणि दर्दी मंडळींनी आपल्या वेळेनुसार जहांगीर कला दालनातील या प्रदर्शनास यावे असे आवाहन त्यांच्याकडून करण्यात आले आहे.

## 'एअरटेल नेक्स्ट्रा'कडून 'सस्टेनेबिलिटी रिपोर्ट'

### मनुष्यबळात महिला कर्मचाऱ्यांची 30% वाढ

प्रतिनिधी
■ मुंबई

भारती एअरटेलची (एअरटेल) उपकंपनी असलेल्या नेक्स्ट्रा डेटा लिमिटेडने (नेक्स्ट्रा बाय एअरटेल) आज आर्थिक वर्ष 2023-24 साठी आपल्या सस्टेनेबिलिटी रिपोर्टची दुसरी आवृत्ती सादर केली.

पर्यावरण, सामाजिक आणि प्रशासन (ईएसजी) निकषांवर नेक्स्ट्राचे सातत्यपूर्ण आणि वाढते लक्ष या अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे. यात भविष्यातील आव्हानांसाठी तयार, डिजिटायज्ड इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्यासाठी नेक्स्ट्राच्या पुढाकारांचा तपशील देण्यात आला आहे ज्याचे डिझाइन त्याला टिकाऊ बनवते आणि कामाचा ताण सामावून घेण्यासाठी आणि ग्राहकांना अखंड स्केल प्रदान करण्यासाठी तयार करण्यात आले आहे, ज्यामुळे त्यांची वाढ सक्षम होईल.

भविष्यासाठी तयार डेटा सेंटर इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्याचे नेक्स्ट्राचे ध्येय "इंटेलिजेंट बाय डिझाइन आणि सस्टेनेबल बाय चॉइस" दृष्टिकोनाभोवती फिरते. 2031 पर्यंत निव्वळ शून्य साध्य करण्याच्या उद्देशाने, नेक्स्ट्रा नाविन्यपूर्ण स्वच्छ ऊर्जा, पाणी आणि कचरा व्यवस्थापन स्त्रोतांभोवती वाढती गुंतवणूक आणि उपक्रमांसह "सस्टेनेबल स्केलिंग" सक्षम करीत आहे.

## विलेपार्लेत निरंकारी इन्स्टिट्यूट ऑफ म्युझिक अँड आर्टस सेंटरचा शुभारंभ

प्रतिनिधी
■ मुंबई

संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून निरंकारी इन्स्टिट्यूट ऑफ म्युज़िक अँड आर्टस् (NIMA) च्या सेंटरचा शुभारम्भ संत निरंकारी सत्संग भवन, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, विलेपार्ले, मुंबई येथे करण्यात आला. त्याचे विधिवत उद्घाटन 23 ऑगस्ट रोजी संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे सचिव श्री.जोगिंदर सुखिजाजी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या प्रसंगी नीमाचे प्राचार्य डॉ.विनोद गंधर्व, संत निरंकारी मंडळाच्या प्रचार विभागाचे समन्वयक श्री.हेमराज शर्माजी, प्रचार प्रसार विभाग के समन्वयक डॉ.दर्शन सिंहजी यांच्यासह मंडळाचे अनेक झोनल इंचार्ज व प्रबंधक उपस्थित होते.

नीमाच्या संदर्भात माहिती देताना श्री.सुखिजाजी म्हणाले की युवावर्गामध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देऊन त्यांना त्या कलांमध्ये पारंगत करून पुढे कला क्षेत्रामध्ये करियर करण्याची संधी मिळवून देणे हा या संस्थेचा उद्देश्य आहे.

ते म्हणाले की, नीमाच्या अंतर्गत तबला, गीटार, हार्मोनियम, डान्स व पेन्टींग यासारख्या कलांचे प्रशिक्षण डिग्री कोर्स च्या रूपात दिले जाते. त्याकरिता संगीत, नृत्य, चित्रकला आदि कलांमध्ये निपुण प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात येते. निमा इन्स्टिट्यूट प्राचीन कला केन्द्र, चंदिगड मध्ये नोंदणीकृत आहे. तसेच अनेक युनिव्हर्सिटीज द्वारा मान्यता प्राप्त आहे. डिग्री कोर्स उत्तीर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना सीबीएसई शाळा, सीबीएसईशी संलग्न शाळांमध्ये संगीत अध्यापक रुपात नौकरीची संधी प्राप्त होऊ शकते. त्याबरोबरच जर कोणी विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या सक्षम नसेल तर त्यांना हे प्रशिक्षण मोफत देण्यात येईल. या शिवाय जर कोणी सांगीतिक विषयात पारंगत असताना वाद्ययंत्र खरेदी करण्यात सक्षम नाहीत त्यांनाही या संस्थेकडून वाद्ययंत्रे उपलब्ध करून दिली जातील.

उल्लेखनीय आहे, की अशा प्रकारचे निमा सेंटर संत निरंकारी सत्संग भवन, वागळे इस्टेट, ठाणे व संत निरंकारी सत्संग भवन, चेंबूर, मुंबई येथे कार्यान्वित आहेत. त्याचा लाभ अनेक विद्यार्थी घेत आहेत. येत्या काळात भारतवर्षात 100 हून अधिक नीमा केन्द्र सुरु करण्याचा प्रयास आहे. मंडळाचे स्थानिक सेक्टर संयोजक श्री.जयप्रकाश उपाध्याय यांनी उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले. तसेच हा कार्यक्रम आयोजित करण्यात महत्वपूर्ण भूमिका पार पाडली.

## टांकसाळ मजदूर सभेच्या अध्यक्षपदी कामगार नेते अ‍ॅड. एस. के. शेट्ये




प्रतिनिधी
■ मुंबई


भारतातील महत्त्वपूर्ण अशा उद्योगात नाणी छपाई करणाऱ्या एकूण चार टांकसाळींपैकी दक्षिण मुंबई येथील "भारत सरकार टांकसाळ, मुंबई" ही एक प्रमुख टांकसाळ आहे.

१८२९ स्थापन झालेली ही टांकसाळ येत्या पाच वर्षात आपल्या स्थापनेची २०० वर्षे पूर्ण करत आहे. देशाच्या व मुंबईच्या विकासात या उद्योगाचे महत्त्वाचे योगदान आहे. १९४७ साली देश स्वतंत्र झाल्यानंतर मुंबई टांकसाळ मध्ये "हिंद मजदूर सभा" या राष्ट्रीय संघटनेशी संलग्न असणाऱ्या "टांकसाळ मजदूर सभा" या कामगार संघटनेची स्थापना करण्यात आली. कॉ. अशोक मेहता आणि कॉ. एफ.एम. पिंटो यांनी या संघटनेची स्थापना केली . टांकसाळ मजदूर सभा ही अमृत महोत्सव साजरी करणारी मुंबई टांकसाळमधील एकमेव मान्यताप्राप्त कामगार संघटना आहे.

२२ ऑगस्ट २०२४ रोजी या संघटनेची वार्षिक सर्वधारण सभा टांकसाळमध्ये पार पडली. या सभेमध्ये संघटनेची नवीन कार्यकरिणी बिनविरोध निवडण्यात आली. त्यानुसार अध्यक्ष -अ‍ॅड. एस. के. शेट्ये, कार्याध्यक्ष - विद्याधर राणे, मुकुंद वाजे, जनरल सेक्रेटरी आणि उपाध्यक्ष - संजय सावंत, खजिनदार - मिलिंद जाधव, उपाध्यक्ष- सुरेश शेट्टी, राजेंद्र महाडिक, विश्वास माने, संजय येलकर, अविनाश घोडके यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे टांकसाळमधील कामगारांनी अभिनंदन केले.

## मुंबईकरांची तहान भागविणारे शिल्लक तलावही भरण्याच्या स्थितीत

■ मुंबई



काल आणि परवा मुंबईत पाऊस पडल्यामुळे उष्णतामान थोडे कमी झाल्याने मुंबईकरांना दिलासा मिळाला. शुक्रवारी मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या तलाव क्षेत्रात ही बऱ्यापैकी पावसाने हजेरी लावल्यामुळे तलावातील पाणी साठ्यात वाढ झाल्याचे दिसून आले. या पूर्वी सात पैकी ५ तलाव भरून वाहू लागले आहेत.आता शिल्लक राहिलेले अप्पर वैतरणा व मध्य वैतरणा हे दोन तलाव ही भरण्याच्या स्थितीत आले आहे. त्यामुळे यंदा मुंबईकरांवर पाण्याचे टेन्शन राहणार नाही.

अप्पर वैतरणा .४१ मीटर, मध्य वैतरणा ८९ मीटर आणि भातसा १.७७ मीटर ने भरायचे बाकी आहेत. शनिवारी सकाळी ६ वाजेपर्यंत संपलेल्या २४ तासात अप्पर वैतरणा तलावात ४६ मिमी,मोडक सागर मध्ये १३४ मिमी, तानसा ५१ मिमी, मध्य वैतरणात ५८ मिमी, भातसात ५६ मिमी, विहार १३ मिमी व तुळशीत ३१ मिमी पाऊस पडल्याची नोंद झाली आहे.

यंदाच्या वर्षी तुळशी २० जुलै रोजी, तानसा २४ जुलै रोजी,विहार व मोडक सागर २५ जुलै रोजी आणि मध्य वैतरणा ४ ऑगस्ट रोजी भरून वाहू लागले. मात्र मध्य वैतरणा ची.पातळी पुन्हा थोडी खाली आली आहे. मुंबईला वर्षाकाठी १४,४७,३६३ दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता असते. आतापर्यंत १३, ७८,८३४ दशलक्ष लिटर पाणी साठा जमा झाला आहे. वर्षभराचा पाणीसाठा जमा होण्यासाठी आणखी ६८,५२९ दशलक्ष लिटर पाण्याची गरज आहे. अजूनही पावसाचा सव्वा महिना बाकी आहे. त्यामुळे मुंबईकरांची वर्षभराची तहान भागेल इतका पाणी साठी जमा होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## महानिर्मितीचा 25 मेगावाट स्थापित क्षमतेचा साक्री-1 सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

- उत्पादित वीज खुल्या बाजारात विकणार
- महानिर्मितीची एकूण सौर ऊर्जा क्षमता 428 मेगावाट

प्रतिनिधी
■ मुंबई

महानिर्मितीने धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यातील शिवाजीनगर येथे एकूण ७० मेगावाट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामध्ये साक्री-१ (२५ मेगावाट), साक्री-२ (२५ मेगावाट) आणि साक्री-३ (२० मेगावाट) चा समावेश आहे. यापैकी साक्री-१ येथे २५ मेगावाटचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे काम मेसर्स गोदरेज आणि बॉयस या विकासकाने इ.पी.सी. (अभियांत्रिकी खरेदी आणि उभारणी तत्वावर) हा प्रकल्प विकसित केला असून क्रिस्टलाईन पद्धतीचे सौर पॅनेल आहेत. या प्रकल्पाची कॅपॅसिटी युटीलायझेशन फॅक्टर (सी.यु.एफ.) २०.५९ टक्के असून वार्षिक वीज निर्मिती ४५.०९ दशलक्ष युनिट अपेक्षित आहे.

२१ ऑगस्ट रोजी हा सौर प्रकल्प कार्यान्वित करून २२०/३३ के.व्ही. शिवाजीनगर, साक्री उपकेंद्राशी यशस्वीरित्या जोडण्यात आला. साक्री-१ प्रकल्पामुळे ५० लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. आता महानिर्मितीची एकूण सौर ऊर्जा स्थापित क्षमता ४२८ मेगावाट इतकी झाली आहे.

**साक्री-१ प्रकल्पाची वैशिष्ट्ये**

या प्रकल्पासाठी ५२ हेकटर जमीन संपादित करण्यात आली असून प्रकल्प खर्च ९३.१२ कोटी इतका आहे. या प्रकल्पातून उत्पादित वीज ही खुल्या बाजारात विकण्यात येणार आहे.

**"साक्री" महानिर्मितीचे सोलर हब**

साक्री येथे महानिर्मितीचा १२५ मेगावाट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प मागील सुमारे दहा वर्षांपासून कार्यरत आहे. त्यात साक्री-१,२,३ सौर प्रकल्प पूर्ण झाल्यावर एकाच ठिकाणी सुमारे १९५ मेगावाट स्थापित क्षमता असलेल्या या सौर प्रकल्पामुळे साक्री महानिर्मितीचे "सोलर हब" म्हणून नावारूपास येणार आहे.

**महानिर्मिती पॉवर ट्रेडिंग क्षेत्रात**

जुलै २०२४ पासून महानिर्मितीने सेझ बायोटेक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड,पुणे समवेत १५ मेगावाट सौर वीज वितरणाचा करार केला आहे.

**प्रगतीपथावर सौर ऊर्जा प्रकल्प**

साक्री-१ येथे २५ मेगावाट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करण्याचे काम मेसर्स गोदरेज एन्ड बोएस कंपनी तर साक्री-२ हा २५ मेगावाटचा सौर ऊर्जा प्रकल्प टाटा पॉवर सोलर सिस्टम , साक्री-३, हा २० मेगावाट स्थापित क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करण्याचे काम मेसर्स स्वरयु पॉवर करीत असून लवकरच हे दोन्ही प्रकल्प कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

**ऊर्जामंत्र्यांनी केले महानिर्मितीचे अभिनंदन**

साक्री-१ येथे २५ मेगावाट स्थापित क्षमतेचा हा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने राज्याचे उप मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांनी महानिर्मिती अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी.अनबलगन यांनी संचालक(प्रकल्प) अभय हरणे आणि (नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प आणि नियोजन) चमुचे तसेच मेसर्स गोदरेज एन्ड बॉयस च्या अधिकारी, अभियंत्यांचे अभिनंदन केले आहे.




**मुंबई ।** सायन कोळीवाड्यात भारतातील महिलांवरील वाढत्या अन्यायाविरुद्ध महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अमित शेट्टी, मुंबई महानगरपालिकेतील माजी विरोधी पक्ष नेते रवी राजा आणि DCC अध्यक्ष हुकुमराज मेहताजी यांच्या नेतृत्वाखाली मूक निषेध करण्यात आला. आपल्या बहिणींना सुरक्षित वातावरण देण्यात केंद्र आणि राज्य सरकारचे अपयश असल्याची टीका करतानाच महिलांनी मिळवलेल्या प्रगतीवरून मी समाजाची प्रगती मोजतो" या भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आठवण यावेळी करून देण्यात आली.

संतप्त जनता आणि डरपोक राज्यकर्ते याचे चित्र मागील आठवड्यात उभ्या महाराष्ट्राने बदलापूरमध्ये पाहिले. निमित्त होते बदलापूर येथील आदर्श विद्यालयात घडलेली दुर्दैवी आणि संतापजनक घटना. या घटनेने केवळ बदलापूरच नाही तर उभ्या महाराष्ट्राने संताप व्यक्त केला. पण हि दुर्दैवी घटना आपल्यावर शेकू नये म्हणूनच शाळा संचालकांनी आणि मुख्याध्यापकांनी पोलिसांच्या मदतीने हि  घटना दाबण्याचा प्रयत्न केला. यामुळे पोलिसांच्या कर्तृत्वावर प्रश्न उपस्थित झाला. या दुर्दैवी घटनेतील शाळा संचालक भाजपा संबंधित असल्याने महायुतीच्या सरकारने या घटनेवर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला असा थेट आरोप महाविकास आघाडीने केला. तर  या दुर्दैवी घटनेतबाबत कठोर  कारवाई करण्याऐवजी विरोधकांच्या चुका काढण्यात सत्ताधारी महायुती अडकली.  सत्ताधारी आणि विरोधकांच्या या गलिच्छ  राजकारणामुळे पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राचे पुरते धिंडवडे निघाले. यामुळे ज्या दुर्दैवी घटनेविरोधात बदलापूरकरांनी एकजुटीने जे आंदोलन केले तो मूळ मुद्दाच बाजूला जावू लागला की काय अशी शंका निर्माण होऊ लागली आहे. परिणामी ज्या शाळेतील टुकार व्यवस्थापनेमुळे आणि मुख्याध्यापिकांच्या चुकांमुळे हि दुर्दैवी घटना घडली त्या शाळेवर कोणतीच कारवाई झाली नाही. ती शाळा नामानिराळी राहिली. उलट या शाळेवर प्रशासक नेमून शिक्षणमंत्र्यांनी या शाळेच्या व्यवस्थापनेला एकप्रकारे बक्षीसीच दिली. प्रशासकाची नेमणूक म्हणजे उंदराला मांजराची साक्षी असेच म्हणावे लागेल. प्रशासक नेमून शाळा व्यवस्थापनांच्या चुकांवर शिक्षणमंत्र्यानी पांघरून घालण्या ऐवजी जर त्या शाळेचीच मान्यता रद्द केली असती तर त्या चिमुकलीसह आंदोलन करणाऱ्या बदलापूरकरांना खऱ्या अर्थाने न्याय मिळाला असताच पण शासनाच्या कारवाईची शिक्षणक्षेत्रात जरब निर्माण झाली असती.



# संतप्त जनता! डरपोक राज्यकर्ते!!



दिसले ते लिहिले

सुरेंद्र मुळीक

बदलापूरच्या आदर्श विद्यालयात घडलेल्या दुर्दैवी घटनेतून बदलापूरची जनता अजूनही सावरलेली नसतानाच राज्यातील राजकारण रंगू लागले आहे. राज्यातील सत्ताधारी महायुती आणि विरोधात असलेली महाविकास आघाडीतील राज्यकर्ते एकमेकांसमोर दंड थोपटून उभे राहिलेले आहेत. बदलापूरकरांच्या न्याय हक्कासाठी आम्हीच आहोत असे विरोधक आणि सत्ताधारी दोघेही सांगत आहेत. म्हणूनच बदलापूरच्या तापलेल्या तव्यावर पोळी भाजण्यासाठी एकीकडे विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली असून 'महाराष्ट्र बंद'  ची हाक सुद्धा दिली होती. तर दुसरीकडे या तापलेल्या प्रकरणात विरोधकांना पोळी भाजण्याची संधी मिळू नये यासाठीच सत्ताधारी पक्षांनी विरोधकांची चांगलीच कोंडी केली आहे. त्यातीलच एक भाग म्हणजे 'महाराष्ट्र बंद' करता येणार नाही असे उच्च न्यायालयाने दिलेले आदेश. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळं सत्ताधारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या गोटात विजयी स्वर उमटले गेलेत. या विजयी स्वराला प्रतिउत्तर देण्यासाठी महाविकास आघाडीतील, उद्धव ठाकरे, शरद पवार आणि नाना पटोले यांनी महाराष्ट्र बंद मधून माघार घेत काळ्या फिती लावून चौका चौकात आंदोलन करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आंदोलनही पार पडले. महाविकास आघाडीच्या या आंदोलनाने काय साध्य झाले हाही तितकाच महत्वाचा प्रश्न आहे. मुळात हे आंदोलन पीडित चिमुकलीला आणि तीच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी होते का! की सत्ताधारी एकनाथ शिंदे, देवेंद्र  फडणवीस यांना कोंडीत पकडण्यासाठी होते हाही महत्वाचा मुद्धा आहे. या आंदोलनात विरोधकांचा प्रामाणिकपणा असला असता तर काल निसर्गाने संततधार धरलीच नसती. या आंदोलनाने सत्ताधारी राज्यकर्त्यांना काहीच फरक पडला नाही, पडणारही नाही. सत्तेतील राज्यकर्ते हे असेच असतात. अत्यंत निगरगट्ट मनाने ते आपले जीवन जगत असतात. आपल्या हाती असलेली सत्ता जावू नये यासाठीच सत्तेतील राज्यकर्ते निगरगट्ट पद्धतीनेच वागत असतात. मग ती सत्ता एकनाथ शिंदे यांची असो,  देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे, शरद पवार, वा नाना पटोले यांच्या काँग्रेसची असो सारेच निगरगट्ट पद्धतीने वागताना दिसत असतात.  त्यामुळे त्यांचे सहकारीही त्याच पद्धतीने वागतात. माझे आणि माझ्या  कुटुंबाचे भले कसे होईल कसे करता येईल आणि त्यातून उरलेच तर आपल्या सोबत असलेल्या चमच्याना कसे देता येईल  हाच या राज्यकर्त्यांचा मूळ उद्देश असतो. त्यामुळेच बदलापूर सारख्या दुर्दैवी घटनेचे गांभीर्य कोणत्याच राज्यकर्त्यांना अजिबात नसते.  ज्या राज्यकर्त्यांना अशा घटनेचे गांभीर्य नाहीच त्यांच्याकडून अशा दुर्दैवी घटनेची तात्काळ कारवाई होईल अशी अपेक्षा करणे चुकीचेच. बदलापूरच्या घटनेने हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. कारण......

आदर्श शाळेत दोन चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार झाल्यावर या गंभीर घटनेवर शाळा व्यवस्थापन आणि मुख्याध्यापिका  पोलिसांच्या मदतीने पांघरून घालण्याचा प्रयत्न करीत असल्याचे समजताच बदलापूरकर संतप्त झाले. संतप्त झालेल्या बदलापूरकरांनी मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या रेल्वे मार्गांवरच ठिय्या धरला. हा संताप इतका प्रखर होता की तब्बल दहा तास बदलापूरकर रेल्वे मार्गांवरून जराही हलले नाहीत. अखेर पोलिसांना लाठीमार करुन बदलापूरकरांना पळवून रेल्वेचा मार्ग मोकळा करावा लागला. पण या दहा तासात पुन्हा एकदा दिसून आले आणि सिद्ध झाले की राज्यकर्ते 'डरपोक' असतात. अजिबात धाडसी नसतात किंबहुना ते डरपोक असल्यानेच नेहमीच पोलिसांच्या संरक्षणात किंवा खासगी गुंडाचे कवच घेऊन फिरत असतात.  बदलत्या जमान्यानुसार हल्ली त्यांना बॉक्सर म्हणतात. हे राज्यकर्ते हजार दोन हजार रुपयांची काळ्या किंवा निळ्या रंगाची सफारी या गुंडावर चढवतात आणि  पोलीस नसलेल्या गाडीवर 'पोलीस' असे लिहून सामान्य जनतेसमोर रुबाब मारीत  फिरत असतात. अशा पद्धतीच्या वागण्यासाठी आमदार खासदार किंवा गल्लीतला नगरसेवकही होण्याची आवश्यकता नसते किंबहुना पदवीधर होण्याचीही गरज नसते. 10 वी नापास असेल तरी चालते. फक्त एखाद्या राजकीय पक्षाचे पद मिळाले की मोठमोठ्याल्या गाडीतून रुबाब दाखवित फिरता येते आणि याच रुबाबाच्या आधारे आमदार खासदार बनता येते.  पण राज्यकर्त्यांचा हाच रुबाब आणि  मस्ती बदलापूरकरांनी एका झटक्यात उतरवली आणि एकट्या दुकट्या माणसाकडे दादागिरी करणारा राज्यकर्ते किती 'डरपोक' आहेत हे बदलापूर प्रकरणात उभ्या महाराष्ट्राने पाहिले. संतप्त झालेल्या जमावासमोर जाण्याची एकाही राज्याकर्त्यांची हिंम्मत झाली नाही, धाडस झाले नाही. ना सत्ताधारांची झाली ना विरोधकांची झाली. सर्वच राज्यकर्त्यांनी सुरक्षित जागेचा आसरा घेतला. जनतेच्या दारोदारी कटोरा घेऊन मतांची भिख मागणारे ना स्थानिक आमदार दिसले ना स्थानिक खासदार दिसले. हे सारे लपून छपून चॅनल ला प्रतिक्रिया देत होते. आणि आंदोलनात बदलापूरच्या बाहेरची जनता आहे असे निर्लज्जपणे बोंब मारीत होती. मुळात आंदोलनात बदलापूरचीच जनता होती हे अटक करण्यात आलेल्यावरून स्पष्ट झाले आहे. त्यातूनही समजा बदलापूरच्या बाहेरची जनता आंदोलनात आली असतील तर त्यात चुकले कुठे. लैंगिक अत्याचार झालेली पिडीत चिमुकली हीं केवळ बदलापूरकरांची लेक नसून संपूर्ण महाराष्ट्राची लेक आहे हे राज्यकर्त्यांनी समजून घ्यायला हवे होते. पण राज्याकर्त्यांनी समजून घेतले नाही. संतप्त बदलपूरकरांची अगणित संख्या आणि रौद्र रूप पाहून राज्यकर्ते घाबरून गेले. परिणामी कोणीही पुढे येण्यास धजावले नाही. ठाणे म्हणजे एकनाथ शिंदे आणि एकनाथ शिंदे म्हणजे ठाणे असे ठाणेकरांचे म्हणणे असूनही एकनाथ शिंदे सारखे लढवय्ये बदलापूर मध्ये फिरकलेच नाही. यावरून बदलापूरकर किती संतप्त झाले होते हे समजता येऊ शकेल. पोलिसांच्या चोख बंदोबस्तात मंत्री गिरीश महाजन आले खरे पण बदलापूरकरांचे रौद्र रूप पाहून महाजन यांनीहि काढता पाय घेतला. जनतेची एकजूट आणि संताप काय असतो हे बदलपूरकरांनी सर्वांनाच दाखवून दिले. या एकजुटीपुढे पोलिसही तब्बल दहा तास मान खाली घालून पाहण्यापलीकडे काहीच करू शकत नव्हते. अखेर दांडूक्याचा वापर करुन पोलिसांनी बदलापूरकरांना पळवले खरे. पण या घटनेमुळे अनेक प्रश्न निर्माण झालेत. सरकारने सामान्यांना योग्य वेळी जर न्याय दिला नाही तर संतप्त झालेली जनता एकजुटीने रस्त्यावर कधीही येऊ शकते! आणि न्यायासाठी रस्त्यावर उतरलेल्या जनतेवर जर पोलीस वारंवार लाठीमार करणार असतील तर संतप्त जनता किती काळ हे सहन करणार! जर संतप्त जनता लाठ्या काठ्या आणि हातात मिळेल ते हत्यार घेऊन रस्त्यावर उतरली तर काय होईल! याचे चित्र जरी डोळ्यासमोर आणले तर पोलीस संरक्षणात फिरत असलेल्या डरपोक राज्याकर्त्यांना गुर्मी उतरेल. या साऱ्या प्रकरणात विरोधकांची विशेषतः उद्धव ठाकरे यांची भूमिका एखाद्या हिंदी चित्रपटाला साजेशी अशीच होती. मारामारी संपल्यावर ज्याप्रमाणे पोलीस येतात त्याचप्रमाणे आंदोलन संपल्यावर उद्धव ठाकरे यांचे शिलेदार बदलापूर येथे दाखल झाले. तब्बल दहा तास विरोधक असलेल्या महाविकास आघाडीचे कोणतेच नेते घटनास्थळी पोहचलेच नाहीत. काँग्रेस, राष्ट्रवादी आणि उद्धव यांच्या शिवसेनेने प्रकरण कसे चिघळेल याची वाट पाहिली. आणि पोलिसांनी लाठीमार करुन बदलापूरकरांना पळून लावताच शिवसेनेचे नेते अंबादास दानवे, सुषमा अंधारे, माजी महापौर किशोरी पेडणेकर बदलापूरकरांत पोहचले आणि उर बडवून घ्यायला लागले. जर विरोधकांना खरोखरच बदलापूरकरांची चिंता होती आणि पीडित चिमुकलीला न्याय द्यावयाचा असला असता तर विरोधकातील नेतानी आंदोलनात सामिल होऊन त्यांना रेल्वे मार्गबाहेर आंदोलन करूया आम्ही तुमच्यासोबत आहोत असे सांगितलं असते तर आंदोलकांनी आंदोलनाची जागा बदलली असती आणि पोलिसांच्या बेछुट लाठीमारात गरीब बदलापूरकर जायबंदी झाले नसते. हि सारी घटना पाहता जितके सत्ताधारी राज्यकर्ते सनी शासकीय व्यवस्थापन जबाबदार आहेत तितकेच जबाबदार विरोधक आहेत असे खेदाने पण ठामपणाने म्हणायला हवे. राज्यकर्त्यांचा हा खेळ  एक ना एक दिवस राज्यकर्त्यांच्या अंगाशी येऊ शकेल असे म्हटल्यास ते चुकीचं ठरणार नाही. कालचा बदलापूरचा उद्रेक हा महाराष्ट्रात होत असलेल्या अन्यायाला नवी दिशा देणारा ठरला आहे. राज्यकर्त्यांना आणि शासकीय अधिकारांना सावध होण्याचा हा इशारा आहे. सामान्यांची कामे करा आणि पुढे चला हाच बोध राज्यकर्त्यांनी आणि शासकीय अधिकाऱ्यांनी यातून घ्यायला हवा. अन्यथा सामान्यांचा भडका उडून देशात अराजकता माजण्यास वेळ लागणार नाही.

## विद्यार्थ्यांच्या सुरेक्षेसाठी 'टास्क फोर्स'ची आवश्यकता...



बदलापूर च्या ज्या आदर्श विद्यालयात दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार झाला त्या शाळेची कोणतीही चौकशी न करता प्रशासक नेमून शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आपल्या काखा वर केल्यात. भाजपा प्रणित शाळेला कारवाईतून वाचविल्याबद्दल केसरकर यांना काय बक्षीसी मिळेल हे येणारा काळात सर्वांनाच दिसून येईल. तोंडावर आलेल्या निवडणुका पाहता त्यांच्या मनात नसले तरी त्यांना कदाचित असा निर्णय घ्यावा लागला असावा. केसरकर तसे नियमात वागणारे मंत्री.  कोणाच्या विरोधात ते स्वतःहून कधीच जात नाहीत.  त्यांच्या याच स्वभावाचा गैरफायदा घेऊन कोणतीही चौकशी न करता शाळेवर प्रशासक नेमण्याचे काम करुन घेण्यात आले. इतकेच नव्हे तर प्रशासक म्हणून आणि त्यांना मदतनीस म्हणून ज्यांना नेमण्यात आले ते सारे शाळेशी संबंधितच आहेत. प्रशासक म्हणून ज्यांची नेमणूक झाली आहे त्या कुंदा पंडित उपशिक्षणाधिकारी आहेत तर त्यांना मदतनीस म्हणून ज्यांची नेमणूक झाली ते राजकुमार जतकर हे अंबरनाथचे गटशिक्षण अधिकारी आहेत. आणि विश्वजित पाटील हे नाईक विद्यालयाचे मुख्याध्यापक आहेत. केसरकर यांनी केलेली हि सारी नेमणूक म्हणजे उंदिराला मांजराची साक्ष असेच म्हणायला हवे.  आपण केलेल्या या साऱ्या गोष्टींकडे जनतेचे दुर्लक्ष व्हावे यासाठी  दीपक केसरकर यांनी ठाण्याचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे आणि मुंबई चे शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ यांना निलंबित केले. वास्तविक या दुर्दैवी घटनेचा मुंबईच्या शिक्षणाधिकाऱ्यांचा काडीचाही संबंध नाही. पण कधी कधी सुक्याबरोबर ओलेही जळते त्याचप्रमाणे शिक्षणाधिकारी कंकाळ यांचा बळी गेला. केसरकर यांनी घेतलेले निर्णय म्हणा किंवा केलेल्या कारवाईचे खरोखरच स्वागत करायलाच हवे. पण या कारवाईमुळे घडणाऱ्या अशा दुर्दैवी घटना थांबतील का! असा प्रश्न आहे. केसरकर यांना खरोखरच शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल करावयाचा असेल तर अनुदानित असलेल्या प्राथमिक आणि   माध्यमिक शाळांच्या शिक्षण निरीक्षकापासून शिक्षणाधिकारी पर्यंत साऱ्यांचीच कसून चौकशी केली.... तर आणि तरच अशा घटना का घडतात याची गुपिते समजू शकतील. शासनाचे अनुदान लाटणाऱ्या मुंबईतील 90 टक्के खासगी शाळेत क्वालिफाईड शिक्षक सापडणारच नाहीत.  संस्थाचालकांच्या नात्यातील आणि भ्रष्टाचाराच्या मार्गाने क्वालिफाई नसलेल्या शिक्षकांच्या नेमणूका झाल्याचे लक्षात येईल. आणि या सर्वाला जबाबदार शिक्षण निरीक्षक असून वरपासून खालपर्यंत हे सारे मस्तपणे सुरु असते. आणि अशाच शाळांचे संचालक शिक्षक आमदार यांचे हात धरून फिरत असतात. म्हणूनच विद्यार्थ्यांचे खऱ्या अर्थाने भले करावयाचे असेल तर ज्या प्रमाणे केंद्राने रुग्णालयासाठी 'टास्क फोर्स' ची नेमणूक केली त्याचप्रमाणे शिक्षणक्षेत्रात राज्यात 'टास्क फोर्स' ची नितांत गरज आहे. कारण शिक्षणनिरीक्षक आणि  शिक्षणाधिकारी संस्थाचालकांच्या हातातील बाहुले बनले आहेत, गुलाम बनले आहेत. आज जरी हे मान्य झाले नाही तरी भविष्यात म्हणजे लवकरच या 'टास्क फोर्स' ची नेमणूक सरकारला करावीच लागणार आहे. या निमित्ताने केसरकर यांनी 'टास्क फोर्स' नियुक्तीचा निर्णय घेऊन शिक्षणक्षेत्रात क्रांती घडवायला हवीत. तरच शिक्षणाच्या गोंडस नावाखाली मनमानी करणाऱ्या शाळांना चाप बसेल.

